
महाराष्ट्राचे शिल्पकार

# ताराबाई शिंदे


स्त्रीपुरुषतुलना.

अथवा

स्त्रिया व पुरुष यांत साहसी कोण
हें स्पष्ट करून दाखविण्या-
करितां हा निबंध.

ताराबाई शिंदे यानीं रचिला.

बुलठाणें.

प्रांत वऱ्हाड.

पुणें येथें

"श्री शिवाजी" छापखान्यांत छापिलें.

सन १८८२ इ०

किंमत २ आणे.


इंद्रजित भालेराव



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राच्या शिल्पकार

# ताराबाई शिंदे

इंद्रजित भालेराव

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ११
प्रथमावृत्ती : २६ मार्च, २००३
द्वितीयावृत्ती : डिसेंबर, २००८

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

किंमत : रु. ४०/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रमणिका

*वच्छुबाई*

*आणि*

*मुक्तुबाई*

---

*तुम्हा दोघींच्या रूपानं*

*ताराबाईंनी मी लहानपणीच*

*अनुभवलं!*

**अनुक्रमणिका**

# अनुक्रमणिका

निवेदन ........................................................................................................ ६

संदर्भ सूची ..................................................................................................... ४७

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेअंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची योजना मंडळाने आखली असून या चरित्रग्रंथमालेतील "ताराबाई शिंदे" हा अकरावा चरित्रग्रंथ आहे.

ताराबाई शिंदे ह्या रूढार्थानं साहित्यिक नव्हत्या. स्त्री-प्रश्नांच्या अभ्यासक नव्हत्या. "स्त्री-पुरुष तुलना" हे सुमारे ५० पृष्ठांचे एकमेव पुस्तक त्यांनी लिहिले आणि स्त्री-प्रश्नांच्या अभ्यासकांनीही थक्क व्हावे, असे स्पष्ट, सडेतोड विचार त्यांनी मराठी माणसाला दिले. लेखकांनी थक्क व्हावे. अशा शब्दांत आपले विचार त्यांनी व्यक्त केले. महात्मा जोतीबा फुले यांनादेखील ताराबाई शिंदे यांच्या "स्त्री-पुरुष तुलना" या पुस्तकाची दखल घ्यावीशी वाटली, एवढ्या तोलामोलाची ही स्त्री आहे. केवळ ५० पानांचं पुस्तक लिहून साहित्यिक व स्त्री-प्रश्नांचा अभ्यासक म्हणून महाराष्ट्रातल्या इतिहासावर स्वतःची नाममुद्रा उमटवणारी ताराबाई ही एकमेव महिला आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

ताराबाई शिंदे यांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी फारशी माहिती उपलब्ध होत नाही. ताराबाई शिंदे ह्या विदर्भातल्या बुलढाणा या आडवळणाच्या गावी जन्मल्या. तिथंच लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यांचा विवाह झाला खरा; पण पतीशी त्यांचं पटलं नाही. संसारसुख त्यांना मिळालं नाही. त्या व्यथित झाल्या. त्या स्वतः घोड्यावर बसून शेतातील कारभार बघत असत. पुरुषांप्रमाणे कोर्टातील कामे करीत असत. यापेक्षा त्यांच्याविषयी अधिक माहिती उपलब्ध होत नाही.

मात्र "स्त्री पुरुष तुलना" या ग्रंथांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं घडणारं दर्शन त्यांच्या व्यक्तिगत जीवनावर अप्रत्यक्षपणे प्रकाश टाकणारं आहे, हे निश्चित.

काही सन्माननीय अपवाद वगळले तर आजही आमचे मराठी साहित्यिक ताराबाई शिंदे यांचे साहित्यिक कर्तृत्व मान्य करणे टाळतात. इतकेच नव्हे तर स्त्री प्रश्नांच्या अभ्यासकांतही त्यांच्या नावाचा समावेश होताना दिसत नाही. याच्या कारणांचा शोध घ्यावयास हवा. असा शोध घेतला तर काही कटू सत्य हाती लागण्याची शक्यता आहे.

ताराबाई शिंदे यांचे "स्त्री-पुरुष तुलना" हे पुस्तक वाचल्यानंतर काही प्रश्न आपल्या मनात उपस्थित होतात.

ताराबाई शिंदे यांना "स्त्री पुरुष तुलना" हे पुस्तक का लिहावंसं वाटलं? या लेखनाच्या निर्मितीमागच्या प्रेरणा काय आहेत? "स्त्री-पुरुष तुलना" हे पुस्तक लिहून ताराबाईंनी अख्ख्या पुरुष जातीशी युद्ध पुकारल्याचा उल्लेख या चरित्रग्रंथाचे लेखक प्रा. इंद्रजित भालेराव यांनी या ग्रंथात केलेला आहे. अख्खा पुरुष जातीशी युद्ध पुकारावे असे ताराबाईंना का वाटले? व्यक्तिगत जीवनात त्यांना जे कटू अनुभव आले त्या अनुभवाशी त्याचा काही संबंध असेल का?

अनुक्रमणिका

"स्त्री-पुरुष तुलना" हे पुस्तक लिहिण्यास त्या काळात देशभर गाजलेला विजयालक्ष्मी खटला अथवा ताराबाईंचं अपयशी सांसारिक जीवन कारणीभूत असलं तरी केवळ याच कारणामुळे हे पुस्तक ताराबाईंनी लिहिलं असावं, असं वाटत नाही. पौराणिक कथांचा त्याचप्रमाणे अलीकडच्या काळातल्या साहित्याचं त्यांचं भरपूर वाचन असावं. हे प्रश्न आपण लेखनाच्या माध्यमातून मांडावयास हवे, असं त्यांना वाटलं असावं व या जाणिवेतूनच या पुस्तकाची निर्मिती झाली असावी.

"स्त्री-पुरूष तुलना" या साहित्यकृतीच्या निर्मितीमागची कारणं काहीही असोत. या पुस्तकाच्या रूपानं ताराबाईंनी एक अमोल ठेवा मराठी साहित्याला दिला, हे मान्य करायलाच हवं.

मुंबई

दिनांक : २६ मार्च, २००३

**रा. रं. बोराडे**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

दीडशे वर्षांपूर्वीचा वऱ्हाड प्रांत. आजच्या महाराष्ट्रातला विदर्भ नावाचा प्रदेश. त्यातलं आज जिल्ह्याचं ठिकाण असलेलं बुलढाणा गाव. त्या वेळी त्याला बुलढाणे असेही म्हणत. इथल्या नावलौकिक प्राप्त प्रचंड मोठ्या वाड्याचे मालक बापूजी हरी शिंदे यांना कन्यारत्न प्राप्त झाले. ही कन्या खरोखरच पुढे रत्नासारखी मौल्यवान ठरली. आभूषणांची आवड असणाऱ्या स्त्रीजातीला अभिमान वाटावा, असे आभूषण म्हणजे ताराबाई.

ताराबाई चार भावांमध्ये एकटीच. त्यामुळे आईवडिलांची लाडकी. तिचे सर्व प्रकारचे लाड केले जात. आई जात्यावर तिच्यासाठी गाणं म्हणायची.

*लाडकी गं लेक*
*हिचे लाड गं चालवा*
*नेनंत्या ताराला*
*बाई म्हणून बोलवा*

लाडक्या लेकीचे लाड चालविले जायचे. बाई न म्हणायच्या लहान वयातही, नेनंत्या म्हणजे नजाणत्या वयातही तिला बाई या आदरार्थी संबोधनानं संबोधलं जायचं. लोक 'बाई, बाई' म्हणून तिला बोलवायचे. म्हणूनच ती ताराची ताराबाई झाली. तारा पुराणात सुग्रीवची बायको तर इतिहासात शिवरायाची पराक्रमी सून. शिवरायांच्या सुनेनं आपलं तारा हे नाव जसं सार्थ केलं तसंच या तारानंही आपलं नाव सार्थ करण्याचा पराक्रम केला. तिनं अख्ख्या पुरुष जातीशीच युद्ध पुकारलं आणि एकतर्फी विजय घोषित केला. कारण तेव्हा समोरची फळी पराभव मान्य करायला तयारच नव्हती. परंतु त्यामुळे तारा खचली नाही. निखळली नाही. दीडशे वर्षानंतरही ती स्त्री मुक्तीच्या नभांगणात शुक्राच्या चांदणीसारखी नव्हे तर सूर्यासारखी तळपतच आहे.

*पहिली गं लेक*
*आईला कामा येती*
*नेनंती ताराबाई*
*उभ्या भिंती पोतरीती*

तारानं आईच्या घरकामाच्या अपेक्षा तर पूर्ण केल्या असतीलच; पण त्याहीपेक्षा तिनं वडिलांच्या अपेक्षा जास्त पूर्ण केल्या. वडील बापूजी हरी शिंदे हे महात्मा जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते. महात्मा फुले यांच्या विचाराने त्यांच्या मनावर प्रभाव गाजविला. सर्व प्रकारच्या समतेच्या भूमिका बापूजींना पटल्या आणि त्यांनी आपल्या घरापासूनच या समतेला सुरुवात केली. त्यांनी आपल्या चार मुलांत आणि पाचव्या मुलीत भेदभाव केला नाही. मुलांच्या बरोबरीनेच तिला वागविले. इतकेच नाही तर ताराच्या आईने जात्यावर म्हटलेली-

*लाडकी गं लेक*
*हिचा लाड नाही बरा*
*जाणं परायाच्या घरा*
*दही मागती दोपारा*

अनुक्रमणिका

ही ओवी ऐकल्यानंतर आपल्या लेकीला परायाच्या घरी जावंच लागणार नाही, अशी व्यवस्था केली आणि तिच्यासाठी तिला नवरा करून देण्याऐवजी बापूजीनं स्वतःसाठी घरजावई आणला आणि लेक नांदायला जाताना होणाऱ्या दुःखाला सामोरं जाण्याची पाळीच येऊ दिली नाही. नाहीतर आई म्हणायची ते गाणं सार्थ झालं असतं-

*लेक नांदाया चालली*
*आयाबायाला भेटंना*
*लेक गळ्याची सुटंना*

*लेक नांदाया चालली*
*दूर पल्याला जायाची*
*वाळू तापली भुईची*

*लेक नांदाया चालली*
*दोन्ही डोळ्यांच्या कोरनं*
*गंगा चालली भरून*

त्या काळी कसायामागं जाणाऱ्या गाईसारखी रडतच नांदायला जाणारी नवरी हे दृश्य ताराबाईला अनुभवावे लागले नाही. मुलगी नांदायला जाण्याऐवजी तिच्यासाठी मुलगाच नांदायला आला. एका अर्थानं मातृसत्ताक रीत ताराबाईनं पुन्हा अंमलात आणली आणि पुढं पुस्तक लिहून पुरुषजातीवरचं स्त्रीजातीचं वर्चस्व सिद्ध केलं. ते आधी असं प्रत्यक्ष कृतीतूनच सिद्ध केलं होतं.

पण ताराबाईंचा हा संसार नीट चालला नाही आणि तिच्या आयुष्याची शोकांतिका झाली. वंशरूपानं तिचा अंश शिल्लक नसला तरी स्त्रीवादी विचाराचा मूळकंद म्हणून ताराबाई मराठी भाषेला ललामभूत राहतील. त्यांच्या आधी आणि त्यांच्यानंतर कुणाही स्त्रीला इतक्या प्रखरपणे स्त्रीची बळकट बाजू घेता आली नाही.

ताराबाईंनीच लिहून ठेवल्याप्रमाणे घरजावई म्हणून येणारा मुलगा काही श्रीमंत आणि कर्तृत्ववान असणार नाही. तसा असलेला मुलगा घरजावई म्हणून येईलच कशाला? घरजावई म्हणून येणारा मुलगा गरीब कुटुंबातल्या आणि कर्तृत्व नसलेलाच असणार. तारासाठी बापूजींनी आणलेला घरजावई याला अपवाद कसा असणार? शेवटी व्हायचे तेच झाले.

*आधी होता वाघ्या*
*दैवयोगे झाला राजा*
*त्याचा येळकोट राहिना*
*मूळ स्वभाव जाईना*

अनुक्रमणिका

त्याला काही या श्रीमंत आणि घरंदाज कुटुंबाच्या पसंतीला उतरेल असे वागणे जमेना. त्याला आपल्या स्वभाव बदलता येईना आणि ताराला त्याच्याशी जुळवून घेता येईना. शेवटी तारा एकटी पडली आणि मग तिने आपला वेळ पूर्णपणे कामात आणि वाचनात घालवायला सुरुवात केली.

ती स्वतः घोड्यावर बसून शेतातला कारभार पाहू लागली. पुरुषासारखी कोर्टातली कामंही करू लागली. पण तिला संसारसुख न मिळाल्याने आणि इच्छा पूर्ण न झाल्यामुळे तिचा स्वभाव तुसडा बनत गेला. खरं तर तिला लग्नाबिग्नाच्या भानगडीतच पडायचे नव्हते पण आईवडिलांच्या आग्रहाने ते कर्म करावे लागले आणि त्यात अपयश आले. त्यामुळे ती व्यथिथ झाली.

अवतीभोवती पाहिलेल्या स्त्रियांचे जगणे आणि स्वतःला आलेला अनुभव यावर तिनं चिंतन करायला सुरुवात केली. जात्यावर तिच्या आईनं म्हटलेली गाणी तिला आठवू लागली-

*लेकीचा जलम*
*जसा गाजराचा वाफा*

*येड्या तुम्ही मायबापा*
*जन्मा घालून काय नफा.*

*लेकीचा जलम*
*कोण्या घातला येड्यानं*

*परायाच्या घरी*
*बैल राबतो भाड्यानं.*

बाईलाच परायाच्या घरी राबण्याची वेळ का आली? ही अशी सामाजिक पद्धती कुणी घालून ठेवली? इतिहासात याविषयी काय लिहून ठेवलंय? आपल्या मनात पडणाऱ्या अशा प्रश्नांची ताराबाईनं उत्तरं शोधायला सुरुवात केली आणि तिला जे दिसत गेलं ते सगळं एका पुरुषसत्ताक पद्धतीनं स्त्रियांना केलेल्या गुलामीचं फलित आहे, हे तिच्या लक्षात येत गेलं.

ताराबाईंनी जेव्हा संतवाङ्मय वाचायला सुरुवात केली असेल तेव्हा तिला सहाशे वर्षांपूर्वी होऊन गेलेली तिची एक सहोदर सापडली असेल. संत जनाबाईंचे अभंग वाचताना पुढील अभंगावर ती नक्कीच थांबली असेल.

*स्त्री जन्म म्हणवुन न व्हावे उदास*
*साधुसंता ऐसे केले मज*

*संताचे घरची दासी मी अंकीली*
*विठोबाने दिली प्रेमकळा*

**अनुक्रमणिका**

*विदुर सात्विक माझीये कुळीचा*
*अंगीकार त्याचा केला देवे*

*न विचारिता कूळ गणिका उद्धरिली*
*नामे सरकी केली तिन्ही लोकी*

*नामयाची जनी भक्ती ते सादर*
*माझे साभाव विटेवरी*

जनाबाईंचा हा अभंग वाचून ताराबाईंना खूप बरं वाटलं असेल. तिच्या मनाची उदासी गेली असेल. एक वारकरी परंपरा तरी स्त्रीला ‘मज ऐसे करणारी आहे’ असे वाटले असेल आणि जनाबाईंचे पुढील अभंग वाचताना तर तारा हरखूनच गेली असेल.

*डोईचा पदर आला खांद्यावरी*
*भरल्या बाजारी जाईन मी*
*जनी म्हणे देवा मी झाले वेसवा*
*निघाले केशवा घर तुझे*

हा रोखठोकपणा ताराबाईंना नक्कीच आवडून गेला असेल. डोईचा पदर खांद्यावर घेऊन भरल्या बाजारात जाण्याचे ऐलान करणारी आणि आपण वेसवा होऊन केशवाचे घरी निघालो असल्याची जाहीर कबुली देणारी जनाबाई ताराला एकदम आवडून गेली असेल.

*देव खाते देव पिते*
*देवावरी मी निजते*

*देव देते देव घेते*
*देवासवे व्यव्हारिते*

*देव येथे देव तिथे*
*देवाविण नाही रीते*

*जनी म्हणे विठाबाई*
*भरुनी उरले अंतरबाही*

देवाशी असा रोखठोक व्यवहार करणारी जनाबाई मीरेचीही आई ठरावी इतकी प्रगल्भ होती, हे पाहून ताराला आपल्या आयुष्यातल्या प्रश्नांची उत्तरं कुणी तरी आधीही शोधून ठेवली असतील, याची कल्पनाही नव्हती.

अनुक्रमणिका

*अरे अरे विठ्या*
*मूळ मायेच्या कारट्या*

*तुझी रांड रंडकी झाली*
*जन्मसावित्री चुडा ल्याली*

*तुझे गेले मढे*
*तुला पाहून काळ रडे*

*उभी राहून अंगणी*
*शिव्या देते दासी जनी*

सगळ्या पुराणकथांचा धांडोळा घेताना देवांनाही अग्नीत उभं करण्याचं बळ ताराला नक्कीच जनाबाईंच्या वरील अभंगाने दिले असेल, यात शंका नाही.

ताराबाईंची मूर्ती तशी ठेंगणीठुसकी होती. वाचन करून करून तिच्या डोळ्यांना जाड भिंगाचा चष्मा लागला होता. म्हातारपणी तिच्या हातात सतत काठी असे. ती मोठ्या ऐटीत पण पायीपायीच शेतात जात असे, असं तिला पाहणाऱ्या लोकांनी लिहून ठेवलं आहे.

तिच्या डोळ्यांवरचा जाड भिंगाचा चष्माही आणि ताराबाईंचं पुस्तकंही याची साक्ष देतं की ताराबाईंचं वाचन अफाट असावं. 'रामायण-महाभारता'सारखी पुराणं, 'रामविजय', 'हरीविजय', 'पांडवप्रताप', मराठ्यांचे इतिहास, इंग्रजी, उर्दू वाङ्मयाचं अवलोकन, अकबर-बिरबलाच्या कथांची आणि इसापनीतीच्या गोष्टीची पुस्तकं, समकालीन कथा-कांदबऱ्या-नाटकं ('मुक्तामाला', 'मंजुघोषा', 'मनोरमा'), नियतकालिकं आणि वृत्तपत्रं, संस्कृत ग्रंथ इत्यादींचे उल्लेख त्यांच्या लेखनात सतत आलेले आहेत. उल्लेख केल्याच्या दहापट जास्त त्यांचं प्रत्यक्ष वाचन नक्कीच असेल.

महात्मा जोतीराव फुले हे तर त्यांचं आराध्य दैवतच होतं. त्यांचं अक्षरन्‌अक्षर ताराबाईंनी वाचलं असणार. पुन्हा पुन्हा वाचलं असणार. कारण त्यांचं पुस्तक वाचताना म. फुले यांच्या लेखनाचा त्यांच्यावर झालेला प्रभाव आपल्या लक्षात येतो.

*"बाळा तू सारासार विचार करून पाहिल्याबरोबर स्त्रियांपेक्षा पुरुषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन जास्ती भयंकर, धाडसी, दुष्ट कर्मे आचरणारे आहेत, म्हणून तुझीसुद्धा खात्री होईल."*

या महात्मा फुले यांच्या विधानाचा खूप खोलवर प्रभाव ताराबाईंच्या मनावर पडला असावा. महात्मा फुले यांचे हे विधान सिद्ध करण्यासाठीच जणू ताराबाईंनी इतिहास धुंडाळून पुरावे शोधून काढले असावेत असे वाटते. वरील महात्मा फुले यांच्या विधानातच आपणाला ताराबाईंच्या पुस्तकाची रूपरेषा पाहावयास मिळते.

अनुक्रमणिका

प्रत्यक्ष महात्मा फुले यांनी जेव्हा ताराबाईंचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक वाचले तेव्हा त्यांनी स्वतः ताराबाईंच्या पुस्तकाचे खूप कौतुक केले. कारण ताराबाईंचे पुस्तक म्हणजे महात्मा फुले यांच्या विचाराला आलेले एक मधुर फळ होते. ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' आणि मुक्ता नावाच्या मातंगाच्या मुलीने लिहिलेला निबंध या भारताच्या इतिहासातील क्रांतिकारक घटना होत्या. म्हणून महात्मा फुले यांनी जेव्हा 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक वाचले तेव्हा ते म्हणाले,

*"सौ. ताराबाई शिंदे, मुक्काम बुलढाणे, प्रांत वऱ्हाड यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या नावाच्या पुस्तकात बहुतेक भर्ते आपल्या स्त्रिया समक्ष पाहिजेल त्या चावचेष्टा करून नीच कर्मे आचरू लागल्यामुळे, कित्येक कुलीन पतिव्रता स्त्रियांस अतिशय विषम वाटून, त्या अज्ञानी व निर्बळ असल्यामुळे अमर्याद कोपाते पावून, त्यांचे मनात दुष्कर्मरूपी समुद्राच्या अतिभयंकर लाटा उद्भवतात, त्याचे निवारण व्हावे या प्रीत्यर्थ त्यांनी पुरुष मंडळास अतिउत्तम बोध केला."*

महात्मा फुले यांनी हे उद्गार 'सत्सार'च्या दुसऱ्या क्रमांकाच्या अंकात लिहून ठेवले आहेत. महात्मा फुले यांच्यासारख्याने त्याची दखल घेण्यातच ताराबाईंच्या लेखनाचे मोठेपण आहे. परंतु ताराबाईंच्या इतर कुणी समकालीनांनी त्याची दखल घेतल्याचे आढळत नाही. प्रत्यक्ष सत्यशोधकांनीही पुढे त्याची फारशी दखल घेतलेली दिसत नाही. प्रत्यक्ष कृष्णराव भालेकरांनी या लेखनाची दखल घेतली, पण त्या लेखनाचे कौतुक करण्याऐवजी त्याची निंदाच केली. त्याचे कारण असे सांगितले जाते की, कृष्णराव भालेकरांनी स्वतः आपल्या पहिल्या बायकोचा छळ करून दुसरी बायको केलेली होती. अशा पुरुषांविषयी ताराबाईंनी आपल्या पुस्तकात फारच तिखट प्रतिक्रिया नोंदवली आहे. ती कृष्णराव भालेकरांना झोंबली असावी आणि कदाचित हा मजकूर आपणालाच उद्देशून मुद्दाम लिहिला आहे असा गैरसमज होऊन त्यांनी या लेखनाची निंदा केली असावी. महात्मा फुले यांनी कृष्णराव भालेकरांच्या या निंदेचीही दखल घेतली असून कृष्णराव भालेकर ताराबाईंच्या पासंगालाही पुरणार नाहीत असा निर्वाळा दिला आहे.

ताराबाई शिंदे यांचं कौतुक आणखी एका कारणासाठी करायला पाहिजे की त्या ज्या मराठा जातीत जन्माला आल्या तिथं स्त्रियांच्या संदर्भात फार गौरवपूर्ण वागणूक होती अशातला भाग नाही. मराठा समाजात आणि दीडशे वर्षांपूर्वी स्त्रियांचे क्षेत्र चूल-मूल यापेक्षा जास्त व्यापक नव्हते. अशा संकोचशील वातावरणातही ताराबाईंनी इतका पुढचा विचार केला आणि तो नुसता मनातच ठेवला नाही तर तो प्रत्यक्ष आचरणात आणला आणि पुस्तक लिहून प्रकाशित करून जगासमोरही आणला.

कारण त्या काळात उच्चवर्णीय समाजातही लिहिणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी होते. ज्या लिहीत होत्या त्यांची वैचारिक झेपही फार कमी होती. कुटुंब कथांच्या पुढे हे लेखन फारसे गेलेले दिसत नाही. जिथं प्रत्यक्ष पुरुषच 'मुक्तामाला'सारख्या भाकडकथा किंवा 'स्त्री चरित्र'सारख्या कपोलकल्पित शृंगारकथा लिहिण्यात आपले आयुष्य घालवत होते तिथे स्त्रियांचे काय? त्यामुळे बहुजन समाजात स्त्री म्हणून जन्माला येऊनही ताराबाईंनी दीडशे वर्षांपूर्वी जे विचार मांडले ते अकल्पनीय वाटतात.

स. ग. मालशेंसारख्या संशोधकांनाही अनेक दिवस असं वाटत होतं की 'ताराबाई शिंदे' असं टोपणनाव घेऊन प्रत्यक्ष महात्मा फुले यांनीच तर हे लेखन केलं नसावं? याचं कारणही हेच आहे की दीडशे

अनुक्रमणिका

वर्षांपूर्वी बहुजन समाजात जन्माला येऊन कुणी स्त्री इतके पुढचे विचार मांडू शकेल; याची कल्पनाही आपण करू शकत नाही.

ताराबाईंच्या या लेखनाचं कौतुक करण्यासारखी आणखी एक बाब म्हणजे ताराबाईंनी हे लेखन बुलढाण्यासारख्या दूरच्या गावी राहून केलेले आहे. पुणे-मुंबईसारख्या प्रसिद्धीमाध्यमांची केंद्र असलेल्या आणि अनेक सामाजिक चळवळीचे माहेरघर असलेल्या गावातल्या कुणा स्त्रीने हे लेखन केले असते तर आपण समजून घेऊ शकलो असतो; पण त्या काळी मागास समजल्या जाणाऱ्या वऱ्हाड प्रांतात राहून, बुलढाण्यासारख्या नगण्य गावात वास करून हे सगळं करणं हेही एक आणखी नवल. तिथं त्यांना एवढे ग्रंथ कुठून उपलब्ध झाले असतील? इंग्रजी, संस्कृत, मराठी ग्रंथांचं हे भांडार कुठून जमा केलं असेल? असे प्रश्न साहजिकच आपल्या मनात निर्माण होतात. ऐतिहासिक पुराव्यांच्या अभावी आपणाला या प्रश्नांची नीट उत्तरं सापडू शकत नाहीत.

ताराबाईंनी हे पुस्तक लिहिलं त्यालाही आता सव्वाशे वर्षे झाली. वर सांगितल्याप्रमाणे ताराबाईंच्या पुस्तकाची समकालीनांनी फारशी नोंद घेतलेली दिसत नाही. मृणालिनी जोगळेकरांनी चौकशी केली तेव्हा प्रत्यक्ष महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या हिंगण्याच्या स्त्रीशिक्षण संस्थेलाही या पुस्तकाची दखल नव्हती. पंडिता रमाबाई रानडे यांनी अशाच स्वरूपाचे पुस्तक ताराबाईंच्या लेखनानंतर केले; पण त्यात कुठेही ताराबाईंची दखल नाही. शिवाय ताराबाईंच्या लेखनाची धार पंडिता रमाबाईंच्या लेखनाला नाही.

काळाच्या ओघात ताराबाईंचे हे पुस्तक कदाचित नष्टही झाले असते. त्याची नावनिशाणीही शिल्लक राहिली नसती. परंतु प्रत्यक्ष महात्मा जोतीराव फुले यांनीच 'सत्सार'च्या दुसऱ्या अंकात ताराबाईंचे कौतुक करण्याच्या निमित्ताने जी नोंद करून ठेवली तो महत्त्वाचा पुरावा शिल्लक राहिल्याने संशोधकांनी छडा लावला आणि ताराबाईंचे लेखन उपलब्ध झाले. नाही तर काही म्हणता काही खरे नव्हते.

महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या 'महात्मा फुले समग्र वाङ्मया'च्या पहिल्या आवृत्तीचे एक संपादक स. ग. मालशे यांनी या पुस्तकाचा शोध लावला. त्यांनी स्वतःच सांगितलेला या संदर्भातला वृत्तांत असा :

"श्री. धनंजय कीर यांच्यासह 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय' या ग्रंथाचे संपादन करीत असताना म. फुल्यांच्या 'सत्सार अंक-२' मध्ये 'स्त्री-पुरुष तुलना' या ताराबाई शिंदे यांच्या पुस्तकाचा गौरवाने उल्लेख केलेला ध्यानात आला होता. तेव्हापासून हे पुस्तक केव्हा उपलब्ध होते अशी रूखरूख लागून राहिली होती. दुर्मिळ पुस्तकांचा संदर्भ पाहण्याचे भरवशाचे ठिकाण म्हणजे दाते-सूची. तीमध्ये या पुस्तिकेचे संक्षिप्त वर्णन आढळले, ते असे :

"शिंदे ताराबाई, स्त्री-पुरुष तुलना, बुलढाणे (श्रीशिवाजी मुद्रणालय, पुणे १८८२, पृ. ६ + ४९, किं. ९ आणे. स्त्रियां व पुरुष यांत साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता निबंध)

'संदर्भ मिळाला, पण नामांकित ग्रंथालयातून पुस्तक काही मिळाले नाही. तेव्हा काही दिवस मी त्याचा नाद सोडून दिला. पण पुण्याचे दुर्मिळ पुस्तकांचे विक्रेते पां. रा. ढमढेरे यांच्याकडे ते योगायोगाने मिळाले. ढमढेरे व मी यांच्यात जुगलबंदीही झाली. मी त्यांच्याकडे एकदा गेलो, तर ते मला म्हणाले,

अनुक्रमणिका

“मालशे तुम्ही ‘साहित्य सहकार’मधून मुलखावेगळ्या पुस्तकांची ओळख करून देता ना? हे बघा एक तसलं पुस्तक.’ ते पुस्तक पाहताच एखादा ठेवा गवसावा, तसे मला वाटले...

“...पुस्तक हाती पडताच अधाशासारखे वाचून काढले. पाहिले तर, विचार क्रांतिकारक नि शैली नाकाला मिरच्या झोंबाव्यात अशी झणझणीत, थेट म. फुल्यांच्या लेखनासारखी. मनात विचार आला, ‘पुस्तक छापलेय पुण्यात. अठराशे ब्याऐंशी साली. आपल्या ‘सत्सारा’त म. फुल्यांनी त्याची तोंड भरून भलावण केली आहे. ‘ताराबाई शिंदे’ असे मराठा बाईचे वर नाव आहे. खुद्द जोतीबांनीच हे फसवे नाव घेतले नसेल?

“दरम्यान प्रा. सदा कऱ्हाडे यांचे बंधू श्री. शंकरराव कऱ्हाडे बुलढाण्यास असल्याचे कळले. त्यांना तशीच आणखीही काही मंडळींना पत्रे टाकली. श्री. कऱ्हाडे यांनी ताराबाईंविषयी बरीच खुलासेवार माहिती कळविली व माझ्या मनातला संशय फिटला.”

श्री. स. ग. मालशे यांनी एवढा आटापिटा केला नसता तर आपणाला कदाचित ताराबाईंचा निबंध उपलब्ध झाला नसता. १९७५ साली स. ग. मालशे यांनी आपल्या सविस्तर प्रस्तावनेसह हा पन्नास पानांचा निबंध प्रकाशित केला. आजपर्यंत त्याच्या तीन आवृत्त्या आणि नागनाथ कोत्तापल्ले व विलास खोले यांनी संपादित केलेल्या स्वतंत्र आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. मृणालिनी जोगळेकर यांनीही ‘टाटा समाजविज्ञान संशोधन संस्थे’च्या एका प्रकल्पासाठी ताराबाईंविषयी आणखी माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला; पण फार उशीर झाल्यामुळे त्याला फारसे यश आलेले दिसत नाही.

ताराबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली ते आपण वर पाहिलेच आहे. ताराबाईंनी लिहिलेल्या ‘स्त्री-पुरुष तुलना’ हा निबंध क्रांतिकारक होण्यास ताराबाईंची जडणघडण तर कारणीभूत आहेच; परंतु ताराबाईंना हे विचार व्यक्त करायला तात्कालिक काय कारण घडले त्याचा शोध घेताना आपल्या लक्षात येते की त्या काळी देशभर गाजत असलेल्या विजयालक्ष्मी खटला हे ते तात्कालिक कारण होय. काय आहे नेमके त्या खटल्याचे स्वरूप? या खटल्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी आपणाला “टाइम्स ऑफ इंडिया” या इंग्रजी वर्तमानपत्रात २६ मे १८८१ रोजी आलेली बातमी फार उपयुक्त आहे. मूळ बातमी अशी :

*“सुरत मुक्कामी सुमारे १९ वर्षांच्या वयात विधवा झालेली विजयालक्ष्मी या नांवाचे ब्राह्मण जातीचे विधवा स्त्रीने व्याभिचार करून गरोदर आहे असे उमर नावाच्या पोलीस पाटलास सन १८८१ सालचे जानेवारी, फेब्रुवारी महिन्याचे सुमारास कळले. त्याने ती हकिकत तेथील चिफ कानिस्टेबलास कळविली; तेव्हा त्याने माजिस्ट्रेटास कळविली; आणि तो गर्भपात न व्हावा असा बंदोबस्त केला तरीही ता. ३० मार्च सन १८८१ रोजी विजयालक्ष्मीबाईने आपल्या चोविसाव्या वर्षाच्या वयांत गर्भपात केला. ते मूल कचऱ्याचे पेटींत पोलिसास सापडले. खुनाचा हा गुन्हा तिजवर शाबीत होवून तिला सुरतेतील, एस हॉमीलेसेशन जज्जसाहेबाने फांशीची शिक्षा दिली.*

*पुढे विजयालक्ष्मीबाईने मुंबईतील हायकोर्टात अपील केले, तेव्हा मिस्टर पिनी व अनरेबल मि. जस्टिस बेष्टसाहेबांनी ता. २५ मे, सन १८८१ रोजी फांशीची शिक्षा रद्द करून विजयालक्ष्मीस जन्मठेपेंची शिक्षा दिली.*

अनुक्रमणिका

*पुढे विजयालक्ष्मीने व तिच्या वतीने इतर लोकांनीही या गुन्ह्याची माफी मिळावी या हेतूने मुंबई सरकारास अर्ज केले. त्यापैकी पुण्यांतील सार्वजनिक सभेनेही ता. ५ जून सन १८८१ रोजी सरकारास एक पत्र लिहिले त्या पत्राचा नंबर ३१, त्यांतील अभिप्राय विजयालक्ष्मीस दिली शिक्षा फार मोठी आहे ती कमी करण्याची कारणे दाखविली तेव्हा मुंबई सरकारने ता. १८ जुलई सन १८८१ रोजी शिक्षा रद्द करून ५ वर्षांची सक्तमजुरीची कैदेची शिक्षा विजयालक्ष्मीस दिली. या तऱ्हेने या खटल्याचा निकाल झाला."*

वरील खटल्याच्या संदर्भात तेव्हा इंग्रजी, हिंदी व मराठी वर्तमानपत्रांतून वृत्तांत, लेख, अग्रलेख, वाचकांची पत्रे, संघटनांचे खुलासे असा बराच मजकूर छापून आल्याने एकुणच स्त्री-प्रश्नांची चर्चा सुरू झाली. त्याचीच प्रतिक्रिया म्हणजे ताराबाईंचे लेखन होय. ताराबाईंच्या लेखनातही हा संदर्भ आलेला आहे. हे तात्कालिक कारण आणि ताराबाईंची जडणघडण व संस्काराचा परिपाक म्हणजे 'स्त्री-पुरुष तुलना' हे क्रांतिकारक पुस्तक होय.

ताराबाईंचा हा पन्नास पानांचा संपूर्ण निबंध म्हणजे एका स्त्री-जातीच्या वतीने संपूर्ण पुरुष-जातीशी केलेला एक दीर्घ संवाद आहे. जणू समग्र पुरुष-जातीला आपल्यासमोर बसवून त्या स्त्री-जातीची कैफियत मांडत आहेत. म्हणून ताराबाईंनी जातिव्यवस्थेतल्या कुठल्याही जातीची बाजू न घेता समग्र जातीतल्या स्त्रियांची बाजू घेतलेली आहे. त्यामुळे त्यात खेड्यापाड्यांतून ते शहरातल्या पुरुषांच्या गुणावगुणांची चर्चा केलेली आहे.

कधी कधी असेही वाटते की, ताराबाईंनी समग्र पुरुष-जातीला कोर्टाच्या कठड्यात उभं करून स्त्रियांच्या वतीने युक्तिवाद केले आहेत. ताराबाईंनी केलेले काही सडेतोड युक्तिवाद पुढीलप्रमाणे :

हिंदू देवदेवतांवर हल्ला करताना शत्रुपक्षात कोण आहे याचा विचार न करता वार करावा हा देवांनीच सांगितलेला युक्तिवाद ताराबाई उपयोगात आणतात. त्यासाठी इंद्रजिताला मारतानाचे लक्ष्मणासाठीचे उद्‍गार ताराबाई उद्‍धत करतात.

समोरच्याला घायाळ करताना पुरुषांना तलवारीसारख्या बाह्य साधनांचा उपयोग करावा लागतो. परंतु स्त्री मात्र आपल्या नेत्रकटाक्षाने समोरच्याला घायाळ करते. तिला कुठल्याही शस्त्रास्त्राची गरजच पडत नाही. वाघ, सिंहाला घायाळ करणाऱ्या पुरुषालाही ती सहज घायाळ करू शकते.

सती सावित्रीच्या संदर्भात युक्तिवाद करताना ताराबाईंनी प्रश्न विचारला आहे की, सावित्री पतीच्या प्राणासाठी यम-दरबारात पोचली तसा पत्नीप्रेमासाठी कुणी पुरुष यम-दरबारात पोहोचल्याचा दाखला आहे काय?

आपल्या पूज्य ऋषीमुनींविषयी कठोरपणे लिहिताना ताराबाई म्हणतात, सर्व ग्रंथकर्ते ऋषी कुणी गाढवाच्या, कुणी पशू-पक्ष्यांच्या पोटी जन्माला आले म्हणून त्यांनी स्त्रियांविषयी लिहिताना जनावरासारखी निर्दय विधाने करून ठेवली.

नवरा मेल्यावर सर्व प्रकारचा त्रास स्त्रीलाच का? बायको मेल्यावर लगेच दुसरी करायला फक्त पुरुषालाच का मोकळीक? नवरा मरावा म्हणून काय स्त्रियांनी देवाला प्रार्थना केली होती काय? केलीही

अनुक्रमणिका

असती, पण विधवेचं भयानक आयुष्य वाट्याला येऊ नये म्हणून तरी त्या तसे करणार नाहीत असा टोलाही ताराबाई मारतात.

इंग्रजांचे खाणे-पिणे-पोशाख-प्रवास इत्यादी सोईच्या सर्व गोष्टी स्वीकारता मग त्यांचे पुरोगामी विचारच का स्वीकारीत नाही? असा प्रश्नही ताराबाई विचारतात.

तुम्ही पुरुष सगळे सद्गुणांचे पुतळे असता तर सगळी कारागृहे पुरुषांनीच का भरून गेली असती?

स्त्रियांनी पतिनिधनानंतर सती जाऊ नये. कारण त्यामुळे पाठीमागच्या लेकरांचा वनवास होतो. उलट बायको मेली तर पुरुषांनी सती जावे. कारण तो जिवंत राहिला तर लगेच मुलांना सावत्र आई आणून त्रास होण्याची व्यवस्था करून ठेवतो.

परपुरुषाकडे पाहणाऱ्या तुमच्या स्त्रीला तुम्ही किती नाडता मग परस्त्रीकडं पाहणाऱ्या तुम्हा पुरुषांनाच का म्हणून सवलत? राजेरजवाडे ऐश्वर्यात लोळणाऱ्या आपल्या स्त्रियांना शरीरसुख न देता नवेनवेच दरवळ हुंगत फिरत असतील तर त्यांच्या राण्यांनी व्यभिचार का करू नये?

टाळी दोन हाताने वाजते खरी; पण त्यात उजव्या हाताचा जोर जास्त असतो. इथं ताराबाईंना म्हणायचं आहे की स्त्रीपेक्षा पुरुषच जास्त दोषी असतात.

तुम्हाला जर कुरूप बायको आवडत नसेल तर आम्हाला तरी तसा नवरा का आवडावा?

तुमच्या आवडत्या पाळीव प्राण्यावर असतं तेवढं तरी प्रेम तुमचं तुमच्या बायकोवर असतं का?

साधुसंतांची सोंगं करून भोळ्याभाबड्यांना आणि स्त्रियांना लुटण्यात पुरुषच पुढे असतात ना?

कपट-कारस्थानं करून सख्ख्या बाप-भावांना मारण्याचे इतिहासही पुरुषांचेच ना?

वरील काही सडेतोड युक्तिवाद पाहिले म्हणजे आपणाला ताराबाईंच्या बुद्धीचे कसब लक्षात येते. हे सारे युक्तिवाद इतके सडेतोड आहेत की ताराबाईंनी विचारलेल्या प्रश्नांना आपणाकडं योग्य उत्तरंच नाहीत. हे युक्तिवाद पाहताना ताराबाईंनी किती सखोलपणे स्त्री-प्रश्नांचा अभ्यास केलाय हे आपल्या लक्षात येईल. ताराबाईंच्या आधी इतक्या खोलवर कुणीही स्त्री गेलेली नाही, हे आपल्या लक्षात येईल.

ताराबाईंच्या लेखनाचा भाषेच्या अंगाने विचार करताना आपल्या लक्षात येते की हे लेखन अत्यंत प्रत्ययकारी आहे. दीडशे वर्षांपूर्वी लिहिलेले हे गद्य वाचायला सुरुवात केली तर आजही आपणाला कंटाळवाणे वाटत नाही. एकदा सुरुवात केली तर शेवटपर्यंत आपण एक पुस्तक हातातून सोडत नाही.

विचारांची प्रखरता हे एक त्याचे कारण आहेच. परंतु अत्यंत संवादी भाषा हे एक खास वैशिष्ट्य म्हणून आपणाला सांगता येईल. जणू या जिव्हाळ्याच्या बैठकीत केलेल्या साभिनय दिलखुलास गप्पाच वाटाव्यात असे हे सारे लेखन आहे. भाषेचा स्त्रीसुलभ गोडवा, म्हणींचा स्त्रीसुलभ उपयोग आणि मजेदार

युक्तिवाद आणि पुढे काय? पुढे काय? अशी उत्कंठा वाढवत नेणारी शैली आणि प्रश्नांची मांडणी ही आणखी काही वैशिष्ट्ये. हा ग्रंथ प्रखर वैचारिक विषयाची मांडणी करणारा आहेच परंतु त्याची मांडणी व भाषा मुळीच कंटाळवाणी नाही. ती लालित्याने भारलेली आहे.

विषयाच्या प्रतिपादनाच्या निमित्तानं जागोजाग आलेली वर्णनं म्हणजे जणू छोटे छोटे ललित लेखच आहेत. इंग्रजांच्या आगमनानंतर कपडे, वस्तू, वागणं बोलणं यात पडत गेलेल्या फरकाचं वर्णन असो की इंग्रजांनी केलेल्या सुधारणा, कायदे, कार्यालये, यांची शिस्त, इंद्रजिताच्या अग्निरथाशी रेल्वेची तुलना करून रेल्वेचे मोठेपण सांगणं असो, विधवांच्या दुरवस्थेची वर्णनं असो की पुण्यातल्या सभासमारंभाची वर्णनं असोत, ताराबाई तो प्रसंग आपल्यासमोर साक्षात करतात. ताराबाईंच्या या लेखनगुणामुळं हा निबंध अत्यंत वाचनीय झाला आहे.

ताराबाईंनी आणखी काही लेखन केले होते का? ते माहीत नाही. ताराबाईंनी महात्मा जोतीराव फुल्यांचे चरित्र लिहायला घेतले होते. ते पूर्ण झाले का? अशी चौकशी करायला त्यांच्याकडं एक सत्यशोधक येऊन गेल्याची आठवण कुणीतरी लिहून ठेवलेली आहे. त्यांनी असे चरित्र लिहून ठेवलेले असेल आणि ते सापडेल तर काय बहार येईल. ताराबाईंचा कदाचित एक वेगळाच पैलू तिथे पाहायला मिळेल. पण हे सगळे मनातले मांडेच ठरणार. तशी शक्यता फार कमी.

ताराबाई या निबंधात सुंदर वर्णन करता करता विषयांतर होईल या भीतीनं मधेच थांबतात आणि असो, जास्त लिहू गेले तर एक वेगळाच निबंध होईल, या विषयावर एखादे वेगळे पुस्तकही होऊ शकेल, किंवा पृथ्वीचा कागद आणि समुद्राची शाई केली तरी हा विषय संपणार नाही; असे म्हणून ताराबाई थांबतात व मूळ मुद्द्याकडे वळतात.

ताराबाईंचा निबंध वाचताना अशा प्रत्येक ठिकाणी मी हळहळलो आहे. कारण असे म्हणून न थांबता ताराबाई लिहीत गेल्या असल्या तर एक वेगळा इतिहास मराठी वाङ्मयाला लिहावा लागला असता. दीडशे वर्षांपूर्वीच्या जगण्याचे तपशील ताराबाईंनी सविस्तर लिहून ठेवले असते तर मराठी वाङ्मयात आणखी एका अजरामर स्मृतिचित्रांची भर पडली असती.

ममतेपासून ममता उत्पन्न होते (इंग्रजी म्हण) श्रीमंत हूये तो आमीर, भिखारी हूये तो फकीर और मर गये तो पीर (उर्दू म्हण), पारखा पाय घराला उपाय, घोडे फेरता बाप मरावा पण राहटाने सूत कातणारी आई मरू नये, आई जेऊ देईना. बाप भीक मागू देईना, झाकली मूठ सव्वा लाखाची, घरोघरी मातीच्या चुली, उसाच्या शेतातून जाल पण अंगाला पाचट लागू देणार नाही, दिव्याखाली अंधार, रजाचा गज करणे, एकाला हाथ तर दुसऱ्याला लाथ, स्त्रीहट्ट, राजहट्ट, बालहट्ट पुढे काही चालत नाही यापुढे. (मराठी म्हणी)

आणि ताराबाईंनी दिलेली काही संस्कृत सुभाषितांची उदाहरणं पाहिली म्हणजे ताराबाईंच्या लेखनाचं आणि बहुश्रुततेचं किती जवळचं नातं आहे, हे आपल्या लक्षात येईल. ज्या लेखनात म्हणींचे उपयोग जास्त ते प्रत्ययकारी तर असतंच पण त्या लेखनाची मुळं इथल्या मातीत रुजलेली आहेत, हेही लक्षात येतं.

अनुक्रमणिका

ताराबाईंची लेखनशैली पाहिली म्हणजे ती तत्कालीन विद्वानांच्या लेखनाइतकी विद्वत्तापूर्ण असूनही बोजड नाही, तर उलट अत्यंत वाचनीय आहे. ताराबाईंनी विचार जरी इंग्रजांचा स्वीकाराला असला तरी लेखनाची शैली मात्र स्वदेशी आणि मऱ्हाटी वळणाची स्वीकारलेली आहे हे आपल्या लक्षात येईल. म्हणून ग्रामीण आणि स्त्रीवादी लेखकांना ताराबाईंच्या लेखनातून अनेक गोष्टी शिकता येण्यासारख्या आहेत.

अलीकडच्या काळात साहित्यात वेगवेगळ्या चळवळी निर्माण झाल्या. दलित-ग्रामीण-आदिवासी साहित्यचळवळींबरोबरच स्त्रीवादी साहित्याचीही एक चळवळ निर्माण झाली. त्याचा पाया आहे जागतिक पातळीवर निर्माण झालेला, विकसित झालेला दृष्टिकोण. त्यालाच 'स्त्रीवाद' असं म्हटलं जातं. अलीकडे निर्माण झालेल्या ललित वाङ्मयाची समीक्षा स्त्रीवादी दृष्टिकोणातून केली जाते. अलीकडे विकसित झालेल्या या दृष्टीकोणातून जुन्या वाङ्मयाचेही मूल्यमापन केले जाते.

अगदी अलीकडं विकसित झालेला हा दृष्टीकोण आपणाला ताराबाईंच्या लेखनात अध्याहृतपणे नांदत असलेला दिसतो. इतकेच नाही तर या दृष्टिकोणातूनच त्यांनी रामायण-महाभारत, पुराणं, इतिहास, कथा, कांदबऱ्या, नाटकं आणि समकालीन घटना पडताळून पाहिल्या आहेत आणि आत्तापर्यंत कुणाच्याही लक्षात न आलेला एक नवाच अन्वयार्थ या घटना-प्रसंगांतून तारांबाईंनी काढून दाखवला आहे. आपल्या हातातला स्त्रीवादाचा परीस त्यांनी सर्वच भारतीय वाङ्मयाला लावून दाखवून त्यातलं हीन आणि सोनं वेगळं काढून दाखवलं आहे. कोण स्त्रियांच्या बाजूचं आणि कोण स्त्रियांचे विरोधक हे अत्यंत परखडपणे त्यांनी दाखवून दिलेलं आहे.

एका अर्थानं ताराबाई शिंदे या पहिल्या स्त्रीवादी समीक्षक आहेत. त्यांनी त्यांच्या समकालीन कथा-कांदबऱ्या-नाटकांचे केलेले समीक्षण पाहताना तर हे जास्तच तीव्रपणे जाणवते.

ताराबाईंच्या लेखनातला स्त्रीसुलभतेचा संदर्भ आपण मागे पाहिला. पण याचा अर्थ असा नव्हे की त्यांचं लेखन निव्वळ बायकी होतं. उलट त्यांच्या लेखनात धीटपणाही खूप पाहायला मिळतो. या संदर्भात मृणालिनी जोगळेकरांनी नोंदविलेले मत पाहण्यासारखं आहे. त्या म्हणतात,

*"ताराबाईंच्या लेखनाची भाषा खूपच आक्रमक व झणझणीत आहे, आतापावेतो हे लक्षात आले आहेच. भाषेच्या बाबतीत शालीनतेच्या, कुलीनतेच्या पारंपारिक मर्यादा त्यांनी झुगारून दिलेल्या दिसतात. 'मी स्त्री, अमुक शब्द माझ्या तोंडी कसा शोभेल?' हा संकोच त्यांच्या लेखनात नाही. नालायकाला नालायक, नादान, भेकड कोणतेही विशेषण त्या लावताना दिसतात. पण सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुरुषांच्या कामुकतेबद्दलही त्या धीटपणाने लिहिताना दिसतात. पुरुषांच्या लंपट, मस्तवाल वृत्तीचे वर्णन अशा शब्दांत करताना वाचणारे काय म्हणतील, हा संकोच त्यांना वाटलेला दिसत नाही. इतकी त्यांची ह्या लेखनाच्या गरजेवरची निष्ठा पक्की दिसते."*

ताराबाईंचे लेखन वाचताना आपणाला वरील विधानाचा प्रत्यय जागोजागी येतो. मुद्दाम अश्लीलता न आणता गरज वाटेल तिथं निःसंकोचपणे लिहिणाऱ्या ताराबाई म्हणूनच अस्सल वाटतात. त्यांचा धीटपणा समर्थनीय वाटतो. त्यांच्यावर कुणीही आक्षेप घेऊ शकणार नाही इतका विवेक त्यांनी पाळला आहे.

अनुक्रमणिका

मृणालिनी जोगळेकरांचे आणखीही एक निरीक्षण नोंदवण्याजोगे आहे. काही भाष्य न करता तो सविस्तर परिच्छेद मी इथे मुद्दाम देत आहे.

*“नैसर्गिक वासनांचे अस्तित्व, त्यांच्या पूर्तीची गरज व त्या अनैसर्गिकपणे दाबल्यास अनीतीकारक वर्तन होणे स्वाभाविक आहे. हे स्त्री-पुरुषांत दोघांतही आहे व सारखेच आहे. एवढा Sex बाबत धीट पुरोगामी विचार एकोणिसाव्या शतकात एक स्त्री मोकळेपणाने मांडते, ही गोष्ट खरोखर आश्चर्यकारक वाटते. कारण तो काळ म्हणजे पेशवाई अस्तंगत झाल्यानंतरचा काळ. ‘शिमगा झाला पण कवित्व मागे उरले,’ अशी थोडीशी अवस्था झाली होती. एकीकडे कसबिणी, कलावंतिणी, तमासगीर, देवदासी वगैरेच्या द्वारे पुरुषांचा अनैतिक देहभोग राजरोस चालू होता, तर दुसरीकडे संतवाङ्मयाच्या प्रभावामुळे व नैतिकतेच्या कृत्रिम अतिरेकाने लैंगिक गरजा ह्या सर्वस्वी त्याज्य व लज्जास्पद मानल्या जात होत्या. त्या विषयी मध्यमवर्गीय समाज तर अतिशय गुप्तता बाळगत होता. त्या विषयी चर्चा तर असंभाव्य गोष्ट मानली जात होती. अशा काळात ताराबाई ह्या गोष्टीची जाहीरपणे आवश्यकता प्रतिपादन करतात. तीसुद्धा अगदी धीट शब्दात, ही गोष्ट खरोखरच विस्मयकारक वाटते.”*

ताराबाईंनी सव्वाशे वर्षांपूर्वी लिहिलेले पुस्तक तेव्हा एखाद-दुसरा अपवाद वगळता पूर्णपणे दुर्लक्षिले गेले आणि नंतर तर अनुपलब्धच झाले. शंभर वर्षांनंतर स. ग. मालशे यांच्यासारख्या महात्मा फुले यांच्या अभ्यासकाच्या लक्षात ही गोष्ट आल्यावर त्यांनी धडपड करून ते मिळविले आणि संपादित करून प्रकाशित केले. त्यानंतर अनेकांनी या पुस्तकावर संशोधन करून संपादनं केली. या पुस्तकाचा इंग्रजीसारख्या जागतिक भाषेतही अनुवाद झाला व गाजला.

खरे तर एका खेड्यातल्या बाईने सव्वाशे वर्षांपूर्वी लिहिलेले पन्नासेक पानांचे चोपडे उपलब्ध झाल्यावर, जे शंभर वर्ष गायब होते, त्याचा एवढा गवगवा व्हावा आणि त्याची तेव्हा मात्र दखल घेतली जाऊ नये याचे कारण ताराबाईंचे विचार एक शतक पुढचे होते, असाच याचा अर्थ होतो. आज स्त्रीमुक्तीचा आणि स्त्रीशक्तीचा अभ्यास करणाऱ्या सर्वांनाच हे पुस्तक अद्वितीय आणि युगप्रवर्तक वाटू लागले आहे.

एखाद्या लहानशा बंदुकीच्या गोळीत ठासून शक्ती भरलेली असावी आणि नेमबाज माणसाने तिचा नेमका उपयोग करावा तसे ताराबाईंच्या पुस्तकाचे आहे. ज्याला ताराबाईंनी निबंध आणि नंतरच्या संशोधकांनी पुस्तिका असे म्हटले आहे, असे हे पुस्तक प्रचंड शक्ती अंगी बाळगून आहे.

खरं तर ताराबाईचं छायाचित्रही आज उपलब्ध नाही. पण जेव्हा आपण ताराबाईंचं लेखन वाचतो तेव्हा विचाराच्या क्षेत्रात रणकंदन करणारी रणरागिणी आपल्या डोळ्यांसमोर उभी राहिल्याशिवाय राहत नाही. तिच्या स्वभावातला कणखरपणा आणि स्पष्टवक्तेपणा तिच्या लेखनातही पुरेपूर उतरला आहे. तिच्या स्वभावातील निग्रहही जागोजागी आपणाला दिसत राहतो.

आता आपण ताराबाईंनी मांडलेल्या विचारांचा परामर्थ घेऊ या. गुजरातमध्ये घडलेली विजयालक्ष्मीच्या खटल्याची हकिकत हे या लेखनामागचे तात्कालिक कारण आहे. ताराबाईंनी लिहिलेल्या प्रस्तावनेत आपल्या लेखनामागचा उद्देश स्वतः ताराबाईंनीच सांगून ठेवलेला आहे. ताराबाईंनी म्हटले आहे.

अनुक्रमणिका

*“ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली, त्यानेच स्त्रीपुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहस, दुर्गुण स्त्रियांचेच अंगी असतात किंवा जे अवगुव स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखववे याच हेतूने हा लहानसा निंबध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे. यात अमुकच जाती किंवा कूळ याकडे माझे मुळीच लक्ष नाही.”*

वरील उताऱ्यात ताराबाईंनी दोन गोष्टी सांगितल्या आहेत. हे लेखन लिहिण्यामागचा उद्देश पुरुषांचे दोष काढणे हा नाही तर स्त्रियांचे गुण दाखविणे हा आहे. जे परंपरेने पडद्याआड झाकून ठेवलंय ते समोर आणणे, परंपरेने स्त्रीचे गुण आणि पुरुषांचे दोष झाकलेले आहेत, हा परंपरेचा पडदा सारला म्हणजे स्त्रीचे गुण आणि पुरुषाचे दोष दिसतील. याला ताराबाईंचा इलाज नव्हता.

ज्या काळात ताराबाई वावरत होत्या त्या काळात योगायोगानं उच्च समजल्या जाणाऱ्या वर्णातल्या मानानं नीच समजल्या जाणाऱ्या वर्णातील स्त्री जरा मुक्तच होती. केशवपन खालच्या वर्णात नव्हते. पुनर्विवाह खालच्या वर्णात होता. खरे तर अजूनही स्वतःला उच्च समजणारे वर्ण याच गोष्टीला खानदान समजून त्यांचा श्रेष्ठतेसाठी विचार करतात. अजूनही विवाहाच्या वेळी हे सगळे पाहिले जाते. त्यामुळे स्त्रीच्या बंधनावर लिहिणे म्हणजे उच्च वर्णावर टीका करणे असा गैरसमज होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वरील उताऱ्यातील ‘यात अमुक जाती किंवा कूळ याकडे माझे मुलीच लक्ष नाही. स्त्री-पुरुषाची तुलना आहे’ हे विधान जास्त महत्त्वाचे आहे. कारण ताराबाईंच्या डोळ्यांसमोर कोणताही संकुचित विचार नव्हता. उच्च विचार होता हे आपल्या लक्षात येईल.

वरील प्रकारच्या एका वाक्याचा खुलासा करून ताराबाई थांबल्या नाहीत तर स्वजातींयावरही त्यांनी ताशेरे ओढले आहेत. बहुजन समजल्या जाणाऱ्या जातींनाही त्यांनी दोष लावला आहे. वरच्या वर्णाचे श्रेष्ठत्वाचे समजले जाणारे गुण आपल्याही अंगात बाणवून घेऊन स्वतःला श्रेष्ठ ठरवण्याच्या नादात या बहुजनांनीही माणुसकीला कामिळा फासून स्वजातीय स्त्रियांना कसे नाडायला सुरुवात केली त्याकडेही ताराबाईंनी आपले लक्ष्य वेधले आहे. प्रस्तावनेच्या दुसऱ्या उताऱ्यात त्या म्हणतात,

*“तसेच पुनर्विवाह ब्राह्मणांतच होत नाही असे काही नाही. दुसऱ्या अवांतर पुष्कळ परभू, शेणवी, गुजराथी, भाटे, मारवाडी, मराठे, देसाई, देशमुख, इनामदार, जहागीरदार, शिर्के, महाडीक, जाधव, भोसले, माने असे अनेक आडनावांचे सोलापूर, सातारा, पुणे, ग्वाल्हेर, इंदूर, या प्रांती असे जे मऱ्हाठशाईला मरतात त्यांचे कुळांत तर ब्राह्मणांपेक्षाही पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते. या लोकांचे घराण्यांत तर प्राणांती असे होणार नाही. अशा उठून गेल्या तर जावूं देतील, पण पुनः दुसरा नवरा कधीच करू देणार नाहीत.”*

वर्ण आणि जातीच्या अभिमानापासून त्या किती दूर होत्या, स्त्री-जातीच्या त्या किती अभिमानी होत्या, ते वरील उतारा वाचताना आपल्या लक्षात येईल.

प्रस्तावनेत ताराबाईंनी पुढे महाराष्ट्रीयन स्त्री-पुरुषांनी आपल्या परिधानात केलेल्या बदलाचीही नोंद केलेली आहे.

अनुक्रमणिका

*“पूर्वीचे किनखापाचे ठाणचे ठाण, ते भरजरी बादली पोषाख, शिरपेंच, मंदील, चंदेरी दुपेटे, पैठणी, लफ्फेदार पागोटे, नागपुरी धोतर जोडे, लालचटक नरम गादीचे चर्मी जोडे, हे कोठे लपले आता?...*

*“सारांश, सांप्रत सर्व पहिली सुदशा जावून आपल्या देशास आवदसा येवूं लागली. पाचपाचशे रुपयाचे शालू, पैठण्या गेल्या. धनवड, नागपूर, बऱ्हाणपूर, सोलापूर, अहमदाबाद ह्या पेठा लपल्या आणि त्यांच्याऐवजी घरोघर ही पातळाचे सोळा हात तुकड्याची निशाणे लागली.”*

ताराबाईंचे वरील विधान वाचत असताना आजच्या आपल्या वाचकाचा एक गैरसमजही होण्याची शक्यता आहे. विचाराने शंभर वर्षे पुढं गेलेल्या ताराबाई परिधानाचा विचार करताना शंभर वर्षे मागे का जात आहेत? ताराबाईंच्याही मनात नकळत कुठेतरी खानदानाचा अभिमान आहे की काय? परंतु तसे मुळीच नाही. ताराबाईंचे पुढील विवेचन वाचले म्हणजे लगेच आपला गैरसमज दूर होतो.

*“या तुमच्या भिकार चाळ्यांनी सर्व प्रकारचे आपले स्वदेशी रोजगार बुडून, हर एक प्रकारचे व्यापारी व कसबी कारागीर लोक उपाशी मरू लागले. वैभव आटत चालले. लक्ष्मीचा आपापल्या घरी राहून घेण्याकरिता जो जो तुम्ही आग्रह करता तो तो ती तुमचे हे असले भिकार चाळे, भ्रष्टाचार पाहून कोसन्‌कोस दूर देशाचाच रस्ता धरू लागली. तर तुम्हाला विधवा स्त्रियांचा व या गरीब कारागीर लोकांच्या मुलाबाळांची कनवळा येवून तुम्ही आपल्या देशाकडे पुनः पहिल्यासारखी नजर फिरवून आपापले धर्म, चाली, देश, रिवाज न सोडता स्वदेशाभिमानी व्हावे, व सर्व प्रकारे स्त्रियांस दोषपात्र करून रसातळी न घालावे म्हणून हा एक लहानसा निबंध तुम्हापुढे सादर केला आहे.”*

ताराबाई परंपरेच्या अभिमानी नसून त्यांना या विधवांचा व कारागिरांचा कळवळा जास्त आहे.

स्वतःच्या लेखनदोषांचे व जाड्या भरड्या शैलीचे समर्थन करताना ताराबाई म्हणतात,

*“तरी मी निरंतर मऱ्हाठमोळ्याचे अटकेतली गृहबंदी शाळेतील मतिहीन अबला असून हा माझा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे या निबंधांत असंगत व तुटक मजकूर अगदी मऱ्हाठशाई जाडी भरडी व अतिशय कडक भाषा असते, पण रोज पुरुषांचे साहस, धाडस व दगाबाजीचे नित्य नवी भयंकर उदाहरणे दिसून येत असतांही तिकडे कोणीच लक्ष न देतां स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात, हे पाहून स्त्री जात्याभिमानाने माझे मग अगदी खळवळून तळमळून गेले. त्यामुळे मला निर्भीड होवून असेच खडखडीत लिहिण्यावाचून राहवेना. तुम्ही एकासारखे सगळेच दगाबाज, कपटी आहात, तेव्हा तुम्ही एकमेकांचे झाकून नेता ते उघडे करून दाखविण्याला याच्याहीपेक्षा कडक जर दुसरे शब्द अगर भाषा असती तर तीदेखील मी वाकडीतिकडी लिहिलीच असती.”*

भाषादोषाविषयी माफी मागत असतानाच ताराबाईंनी आपल्या भाषेतल्या कडकपणाचे समर्थन करून शक्य असते आणि उपलब्ध असती तर आणखीही यापेक्षा कठोर भाषा आपण वापरली असती, असा निर्भीड निर्वाळा त्या देतात आणि शेवटी पुरुषत्वाच्या नावाखाली माझ्या लेखनाकडं दुर्लक्ष किंवा टीका कराल तर मी

*“तरी सर्वदा स्वजाती कल्याणार्थ झटून त्यांचे मनांत सदाचारणाचे बीजारोपण करीनच करीन.*

*कळावे.”*

असा निश्चय आणि आशावाद व्यक्त केला आहे. ‘स्त्री-पुरुष तुलना’ या आपल्या निबंधाची सुरुवातच ताराबाईंनी अशी केलेली आहे,

*“अलिकडे स्त्रियांच्या दुष्कृत्याविषयी (विजयालक्ष्मीच्या गर्भपाताच्या निमित्ताने वृत्तपत्रात तेव्हा सुरू झालेल्या चर्चेला उद्देशून) वृत्तपत्रातून बरेच छापून येत असतांना पुरुषांपैकी कुणीच कसा समोर येत नाही आणि या स्त्रीजातीवर ओढवलेल्या संकटातून त्यांना कुणीच कसा बाहेर ओढून काढत नाही, स्त्रियांवर ही दुष्कृत्य करण्याची वेळी का आली? तर त्या विधवा आहेत आणि त्यांचा पुनर्विवाह होवू शकत नाही म्हणून.”*

पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगाप्रमाणे सर्व जातीत पसरल्याचा उल्लेखही ताराबाई सुरुवातीलाच करतात आणि त्यामुळे कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचे दुःख असह्यपणे कशा सहन करतात तेही ताराबाई सांगतात.

या संदर्भात विलास खोले यांनी आपल्या ‘स्त्री-पुरुष तुलना’ या संपादनाच्या प्रस्तावनेत दिलेली माहिती उद्‌बोधक आहे. ताराबाईंच्या समकालीनांनी लिहून ठेवलेला काही तपशील त्यांनी खालीलप्रमाणे दिला आहे.

*“लोकहितवादींनी पुनर्विवाहाअभावी स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या दुर्दैवाचे प्रत्ययकारी वर्णन केले आहे. ते लिहितात, “स्त्रियांचा पुनर्विवाह होत नाही, याजमुळे मुलीचे जन्माचे मोठे संकट प्राप्त होते, कारण तिचा नवरा मेला म्हणजे सर्वस्वी घात होवून ती आईबापाचे येथे येवून राहणार, तेव्हा आईबापास असे होते की, जन्मापर्यंत हिला आम्ही खायास घालावे, यापेक्षा ही मेली तर बरे, कारण अन्न घालून तरी सुख नाही. तिचे विद्रूप आणि हाल इतकेच पाहावयाचे. आणखी सासरचे लोक म्हणतात की, आमचा मुलगा मेला तेव्हा या रांडेचा पायगुण वाईट, मग ही कशास पाहिजे? असे म्हणून तिला वाईट कामे सांगतात.” विधवाच्या पुनर्विवाहाची परवानगी नाकरल्याने जे अनर्थ होतात त्या संदर्भात उद्‌बोधक ठरेल अशी आकडेवारी नोंदविली गेली आहे. लोकहितवादींच्या उपर्युक्त पत्रातच त्यांनी तोफखान्यावरील सरदार पानसे यांच्या घरी सत्तावन्न बोडक्या होत्या, असे नमूद केले आहे. त्यापुढेच ते लिहितात, “मला खचित वाटते की यामुळे एका जिल्ह्यात सरासरी शंभर बाळवधू होत असतील. त्यामानाने पुण्यात व आसमंतात प्रांती शंभर कोसात दोन हजार लेकरे मारली जातात.” नारायण केशव वैद्य यांनी ‘पुनर्विवाह निषेधकांस चष्मा अथवा हिंदुस्थानातील विधवांचे दर्शन आणि बालकांचे नाशन, भाग पहिला, पूर्वार्ध’ या पुस्तिकेत १८८१ सालच्या खानेसुमारीच्या रिपोर्टवरून या सर्व हिंदुस्थानातील पुनर्विवाह न होणाऱ्या ब्राह्मणादी जातींतल्या विधवांचे हातून पंधरा वर्षांत १२,५४२ बालहत्या झाल्या, अशी आकडेवारी दिली आहे.”*

ताराबाईंनी लाखो-कोट्यवधी विधवांच्या दुर्दैवाचा जो आकडा दिला आहे त्याला त्यांच्या समकालीनांच्या लेखनात असा पुरावा आपणाला प्राप्त होतो. विधवेचे आयुष्य आपल्या वाट्याला येऊ नये आणि दुर्दैवाचे दशावतार आपणाला पाहायला मिळू नयेत म्हणून तेव्हाच्या आणि आताच्याही स्त्रिया

आपणाला नवऱ्याच्या आधी मरण येऊ दे अशी प्रार्थना देवाकडं करतात. जात्यावरच्या स्त्रियांच्या गाण्यात आहेत. त्यामुळेच आहेव मरणाचे (म्हणजे कपाळावर कुंकू असताना, म्हणजेच नवरा जिवंत असताना) महत्त्व सांगण्यात आलेले आहे.

*आहेव मरण*
*सख्याच्या गं मांडीवरी*
*हिरवी चोळी दंडावरी*
*शालू झाका तोंडावरी*

*आहेव मरण*
*गेली नवरी होऊन*
*सरगीचे देव*
*उभे आरती घेऊन*

*आहेव मरण*
*जन मनीतय मेली*
*ऐका भरताराची बोली*
*रानी माहेराला गेली*

*आहेव मरण*
*सोमवारी सकाळून*
*हाळदी कुखानं*
*सूर्य गेला झाकाळून*

*आहेव मरण*
*बाई देवाला मागते*
*गांधारे काशिबाई*
*तुह्या कासला लागते*

*आहेव मरण*
*कोण्या भाग्याचीला आलं*
*दारामधी बंधू बोलं*
*बाई तुम्ही बरं केलं*

*आहेव मरण*
*भरतार रडतो चोरून*
*भाऊ बोलतो दूरून*
*देतो दुसरी करून*

अनुक्रमणिका

*आहेव मरण*
*पुरुष रडतो चोरून*
*सांगते रामराया*
*नांदा दुसरी करून*

*आहेव मरण*
*सरण जळतंय वढ्याला*
*आपल्या संसाराची*
*वड लागली जोड्याला*

आपण नवऱ्याआधी मेलो तर प्रत्यक्ष परमेश्वर स्वर्गात आपल्या स्वागतासाठी, आरती ओवाळायला उभा असेल असे तिला वाटते. कारण नवऱ्यानंतर पांढऱ्या कपाळानं जर आपण इथं जिवंत राहिलो तर ते जगणं नरकासमान असणार आहे, ह्याची तिला कल्पना आहे. आपण नवऱ्याच्या आधी मरावं अशी प्रार्थना ती करते आणि तसे झाले तर ती किती भाग्यवान आहे. असे सगळेच लोक बोलतात. इतकंच नाही तर सख्खा भाऊदेखील, 'बाई तुम्ही बरं केलं', असंच म्हणतो. कारण तिच्या विधवापणाला त्रास त्याला पाहावला नसता. म्हणून सख्खा बहिणीच्या अहेव मरणानं भावाला बरं वाटतं. कारण नवरा जिवंत असताना या भावानं अनेकदा बहिणीचा असह्य सासुरवास पाहिलेला असतो.

*बहिणीचा सासुरवास*
*भावानं आईकिला*
*वाळूमधी झरा केला*
*वंजळीनं पानी पेला.*

असा अनुभव त्याला अनेकदा आलेला असतो. सख्खा बहिणीच्या घरी पाणी प्यायची इच्छा शिल्लक राहू नये, इतके सासुरवास अनुभवावे लागायचे. हे पतीच्या जिवंतपणी! त्याच्या मृत्यूनंतर काय हाल होतील याची कल्पनाही कुणी करू शकणार नाही. म्हणून बहिणीच्या मरणाच्या दुःखाबरोबरच तिच्या आहेवपणाच्या मरणाचा भावाला आनंद आहे.

वरील लोकगीतात आपली बायको मेली म्हणून तिचा पती, भरतार रडतो आहे. तेही चोरून. कारण आपली बायको मेली तर उघडपणे दुःख करून त्याला जगात अपमानित व्हायचे नाही. आपलं दुःख व्यक्त करण्याची परवानगी या पुरुषाला नाही. कारण हे दुःख बायकोच्या मरणाचं आहे आणि समाजाच्या दृष्टीने ते दुःखच नाही. या चोरून रडणाऱ्या पुरुषालाही त्याचा भाऊ पाहातो आणि म्हणतो, 'काय रडतोस बायकांसारखा, तुला मी लगेच दुसरी बायको करून देईन. तुला काय बायकांसारखं तसंचं थोडंच राहावं लागणार आहे. बाई असतास तर गोष्ट निराळी.'

एका बाजूला पुरुषाची वागणूक अशी तर दुसऱ्या बाजूला स्त्रीची वागणूक मात्र माणुसकीची. मेलेल्या स्त्रीच्या आत्म्याला कळतं की आपण मेल्यामुळं आपला पती दुःखी झाला आहे. तिला हे दुःख पाहावत नाही म्हणून ती म्हणते, 'सांगते रामराया नांदा दुसरी करून.' आणि पुरुषही थोडं रडून लगेच

अनुक्रमणिका

दुसऱ्या भोवल्यावर चढायला अधीर होतो. पहिलीचं सरण तिकडं ओढ्याला जळत असतानाच इकडं दुसरीसोबत संसाराचा ओढा पुरुषाला लागतो.

आपण मेलो तर नवऱ्यानं आपल्या आठवणीत आयुष्य वाया घालवण्याची गरज नाही. इतका संवेदनशील विचार स्त्रीला सुचू शकतो. आपल्या मरणानंतर आपल्या बायकोनं दुसरं लग्न करून सुखानं नांदावं. पाहिजे तर आपणाला स्मरून, पाहिजे तर आपणाला विस्मरून असं म्हणणारा एखादाच नारायण सुर्वे!

ऐन तारुण्यात जर स्त्रीच्या वाट्याला अशी वैधव्याची कुऱ्हाड आली तर तिनं आपलं उर्वरित आयुष्य कसं घालवायचं असा प्रश्न असतो. ताराबाई म्हणतात,

*“मनोनिग्रह करून मनुष्यवस्तीत राहून स्त्री धर्मरक्षण होणेच नाही. मनाने व नेत्राने तरी त्या दोषाला पात्र होतातच. एक केशवपन केले व दुसरे कुंकू पुसून सर्व सौभाग्य हिसकून घेतले. म्हणून काय झाले? त्यांचे अंतःकरण, बारे-वाईटाचे विचार त्यांचेजवळच आहेत. सर्व बाह्य प्रकारांनी नागविले पण अंतर कोण नागवील?”*

माणसाच्या मूलभूत भावभावनांचा ताराबाई यांनी किती आस्थापूर्वक विचार केला आहे ते आपल्या वरील वाक्यातून लक्षात येईल. पातिव्रत्याच्या कल्पनेविषयी विचार करताना फक्त व्यभिचार नाही केला म्हणजे पातिव्रत्य झाले, असे नव्हे तर पातिव्रत्य मोडण्याला अनेक कारणे असतात. ती ताराबाईंनी सांगितली आहेत. आपण ज्याला स्त्रीधर्म म्हणतो तो तरी काय असतो आणि त्या धर्माची अपेक्षा ज्या पुरुषाच्या सापेक्ष असते तो तरी कसा वागतो? ताराबाई म्हणतात,

*“स्त्रीधर्म म्हणजे काय? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याचे मर्जीप्रमाणे वागणे, त्यांनी लाथा मारील्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेविल्या, नवरूची दारू पिवून, जुवा खेळून, कफल्लक होवून, शंख करीत, चोरी करून, कोणाचा प्राण घेवून, फितूर, चाहाडी, खजिना लुटून, लाच खाऊन जरी घरी आले; तरी स्त्रियांनी आपले हे कोणी जसे काही कृष्णमहाराजच गौळ्यांचे दही-दूध चोरू चंद्रावळीला कलंक लावून आलेत; असे समजून परमात्मासारखीच त्यांची हसतमुखाने पूजा करावी, सेवेत हजर राहावे हा स्त्रीधर्म. पण जेथे बरे-वाईटाचा विचार आहे तेथे स्त्रीधर्म कसा राहील; तेथे विकल्प तेव्हाच येईल की नाही.”*

*“सावित्री आख्यानात पतिव्रतेचे नेम सांगितले आहेत त्याप्रमाणे काटेकोर आज कोणती वागते? अशी एक उगीच दाखल्याला दाखवा बरे?”*

*“त्यात सांगितले आहे की, पतीने लाथ मारली तर हासून म्हणावे की, नका पतिराया मारू हो, तुमचे पाय दुखतील. असे म्हणून महाराजांचे पाय लगेच रगडीत बसावे.. जो पदार्थ नवऱ्याला नको तो हिनेही वर्ज्य करावा.”*

आज या पातिव्रत्याचा कसा बोजवारा उडालेला आहे, त्याचे फार विनोदी ढंगात ताराबाई वर्णन करतात. आणि मग एवढं सगळं मोडीत निघालेलं असताना पुनर्विवाह न करण्याची रीत मात्र का मोडीत

निघत नाही असा प्रश्न ताराबाई आपणाला विचारतात. आणि स्त्रियांनी वरीलप्रमाणे पातिव्रत्याचे नियम पाळावेत असे वाटत असले तर पुरुषांनीही तसेच वागावे अशी रास्त अपेक्षा ताराबाई व्यक्त करतात.

*"जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूकदेखील देवाप्रमाणे पाहिजे. बायकांनी भक्ताप्रमाणे जशी भक्ती करावी तशी नवऱ्यानेदेखील त्याजवर देवाप्रमाणे ममता करून त्यांचे सुखःदुख जाणावे की नाही."*

ताराबाईंनी पतीची वागणूकही देवाप्रमाणे असावी असे म्हटले खरे; पण इकडे देव-देवता व ऋषीमुनी यांचा इतिहास पाहू गेले तर तो काही फारसा माणसापेक्षा वेगळा नाही. देवांनीही आणि ऋषीमुनींनीही आपल्या बायकांशी काही फार चांगला व्यवहार केलेला नाही. ज्या सुखाचा उपभोग नवऱ्याला घेता येत नाही त्या सुखाचा उपभोग बायकोनेही घेऊ नये, या नियमानुसार धृतराष्ट्र आंधळा होता म्हणून त्याच्या बायकोनेही आपल्या डोळ्यांचा उपयोग केला नाही. चांगले डोळे असतानाही पट्टी बांधून आयुष्यभर आंधळेपणाचा स्वीकार केला. आणि जणू काय तेव्हापासून स्त्रीजातीच्या अंध पतिभक्तीलाच सुरुवात झाली.

ताराबाई म्हणतात, तरी ठीक आहे. आपल्या नवऱ्यासाठी एवढा त्याग करणाऱ्या आदर्श पतिव्रतेचे असे एखादे उदाहरण असेलही, पण नेहमी ज्या पतिव्रतांचा उल्लेख केला जातो आणि आदर्श पतिव्रतांचा नमुना म्हणून ज्यांची उदाहरणं दिली जातात त्यांचेही पातिव्रत्य एकदा तपासून पाहायला पाहिजे. ज्या शास्त्रं, पुराणं पोथ्यांची उदाहरणं दिली जातात त्यांची उलटतपासणी केली तर आपण तोंडघशी पडण्याची शक्यता जास्त, असं ताराबाई म्हणतात. ज्या पतिव्रतांची नेहमी उदाहरणं दिली जातात त्यातल्या एक दोघी जणी तर दोषी असूनही त्यांची गणना पतिव्रतांच्या यादीत फार वर केली जाते हे कसे?

पाच पांडवांची बायको असणारी द्रौपदी, सहाव्या कर्णाचं चिंतन आपल्या मनात करतेच. आपल्या पतीचं मायावी रूप घेऊन आलेल्या इंद्राला भुललेली अहिल्या शिळा होऊन पडली तरी तिची गणना श्रेष्ठतेतच केली जाते. सत्यवतीने कुमारपणातच पराशराशी संग करून व्यासाला जन्म दिला आणि कुंतीनेही लग्नाआधी कर्णाला जन्म दिला. यावर ताराबाई म्हणतात,

*"वारे देव! वारे ऋषी! एकाचढी एक तेव्हा नाही का एक गंधर्व विवाह होवून पुनःशंतून व पांडूराजाबरोबर पाणीग्रहण केले. मग तो नाही का पुनर्विवाह झाला? तेव्हा जी पोरे झाली ती उदार कर्ण व वेदव्यास पूज्यमान होवून देव त्यांचे पाया पडू लागले. आता तसे पोर झाले की, कोणी म्हणतो लेकावळा (बटकीचे पोटी जन्मलेला), कोणी म्हणतो खर्चा कोणी म्हणतो विदुर, कोणी म्हणतो गोळक, पण कुमारीचे पोटी झालेला त्याला काय म्हणावे हो? हे सांगा. मोठे शास्त्रपुराण पारंगत झाले आणि त्यांनी भारतासारखे ग्रंथ केले म्हणून आईबापही त्यातच पावन केले का? कर्णानी पांडवाबरोबर कुरुक्षेत्री लढाई केली त्यातच आईला त्या दोषातून मुक्त केली असे वाटते.*

*"तारा ही वाली वानराची बायको. त्यानी आधींच धाकटा भाऊ सुग्रीवाची बायको रूमा हिला घरात बंधू सुग्रीव काळतोंडे लांब शेपटीचे बांदरोबा यास हाकलून लाविले. पुढे रामचंद्र महाराज भेटले. तेव्हा समदुःखी एकाची बायको रावणाने नेली. एकाची भावाने नेली. काय मेळ संगम बरोबर झाला! तेव्हा रामचंद्रजींने सुग्रीवाची कीव करून वालीला कपटाने मारून ताराचे लग्न सुग्रीवाबरोबर लावू लागले. तेव्हा*

*ती बिचारी म्हणाली की, 'महाराज हे कसे? धाकटा दीर म्हटला म्हणजे मुलासारखा. तेथे हे मला अनुचित दिसते.' तेव्हा रामचंद्रांनी सांगितले की, काही चिंता नाही. तू धाकट्या दिराबरोबर पुनर्विवाह केलास तरी तुझे नाव पतिव्रतेमध्येच गणले जाईल."*

इथेच आपल्या लक्षात येईल की, ताराबाईंनी स्त्रीवादी दृष्टिकोणातून रामायण आणि महाभारतात आलेल्या स्त्री-पात्रचित्रणाचे परीक्षण केले आहे. मूळ कथांचा जसा परामर्श ताराबाईंनी घेतला आहे तसाच परामर्श या कथा ज्या मराठी आख्यानकाव्यातून ताराबाईंपर्यंत पोचल्या त्या 'रामविजय' व 'पांडवप्रताप' या ग्रंथांच्या कर्त्याचे, श्रीधर स्वामींचेही परीक्षण ताराबाई स्त्रीवादी दृष्टिकोणातून करतात. आणि हे प्रतिभावंतदेखील स्त्रियांच्याबाबतीत कसा दुजाभाव ठेवून होते हे सांगायला त्या विस्मरत नाहीत. हे सांगत असताना त्यांच्या लेखणीला उपहासाची धार कशी चढते ते आपणाला पुढील उताऱ्यात पाहायला मिळेल.

*"तेथे श्रीधरस्वामींनी लेखणीचे दोन टंक अधिक मारिले की, देवांनी केले त्याला काही हरकत नाही; मानवाने तसे करू नये. पण स्वामीला तेव्हा एवढे कसे नाही कळले की, हा कित्ता पुढे सारे अगदी वळणशुद्ध वळवितील काय करतील हो! सुग्रीवाचे राज्याभिषेकाचे गर्दीत, द्रव्याच्या मोटा बांधण्याचे धांदलीत विसरले. नाही तर आणखी एखादी ओवी जरा धास्ती बसण्याजोगी लिहिली असती."*

पुढे सीता आणि मंदोदरीच्या पातिव्रत्याची कहाणी सांगतानाही ताराबाईंच्या लेखनाला अशीच धार चढते. पळवून आणलेल्या सीतेचा तिने स्वखुषीने रावणाशी लग्न केल्याशिवाय काहीच उपयोग नव्हता. कारण बळजबरीने रावण कुणा स्त्रीशी रत झाला तर त्याचे शंभर तुकडे होतील, असा शाप त्याला मिळाला होता. सीतेशी बळजबरीने वागावे तर स्वतःला संपवावे लागणार. तिला सोडून द्यावे तर तिच्या सौंदर्याची रावणाला इतकी भुरळ पडली होती की ते शक्य नव्हते. म्हणून रावणाने आपली बायको मंदोदरी हिला सीतेला समजावून सांगावयास व स्वखुशीने लग्नास तयार करावयास पाठविले. मंदोदरीने तसा प्रयत्न केला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. पण लांड्यालबाड्या करून एखाद्या स्त्रीला आपल्या नवऱ्याची इच्छा पूर्ण करायला भाग पाडण्याचा प्रयत्न केल्यामुळे मंदोदरीचे नवा मात्र पतिव्रतांच्या यादीत समाविष्ट झाले.

हे उदाहरण दिल्यानंतर ताराबाईंच्या लक्षात आले की आपण समाजात त्यांना फार मानतात अशा श्रद्धास्थानांवरच कडक ताशेरे ओढले आहेत. आपण ज्यांना देव समजतो त्यांच्याच पापाचरणांची उदाहरणं दिली आहेत. तेव्हा हे लोकांना पचेल का? आपल्या स्पष्ट विचारांचं समर्थन आपण कसं करू शकू? आणि मग ताराबाईंना तोही युक्तिवाद सुचला.

*"आता यात थोडीशी आपल्या देवाची निंदा करूं नये ती करणे भाग आले. कारण खऱ्याला काय? ते कसेही असो, आपल्या शास्त्रात सांगितले आहे की, लढाई करतेवेळेस बाप, भाऊ जर समरांगणांत समोर आपल्याशी लढू लागले तर बेलाशक मारावे, मागेपुढे पाहू नये. लक्ष्मणांनी इंद्रजित मारला तेव्हाच श्रीरामचंद्रजीने सांगितले की, बाबा लक्ष्मणा काय करतोस; क्षत्रिय धर्म मोठा कठीण आहे. जावई असो, का पोटचा मुलगा असो; कोणाची भीड धरणे नाही. ते वेळेस सुलोचनेचे खरे पावित्र्य पाहून इंद्रजिताला उठविणे हे रामाचे स्वाधीन होते. पण मारुतिबोवाचे व बिभीषण घरभेदी याचे ऐकून सुलोचनेसारखे दुर्मीळ रत्न विस्तवांत घालून जाळून टाकले. असो, तसे आता खरे जे समोर आले ते उघडे करून दाखविणे जरूर पडले म्हणून जराशी यात दोन-तीन देवांची निंदा केली याची मी त्यांचेजवळ प्रार्थना करून माफी मागेन.*

*क्षमा केली न केली तरी ते देव आहेत. तेव्हांचे ऋषी तरी काय? कोणी हरणीचे पोटी झाले. ते कोण श्रुंगऋषी, कोणी पाखराचे पोटी झाले; ते भारद्वाज, कोणी गाढवीचे पोटी झाले; ते गर्धभऋषी. गायीचे पोटी झाले ते वृषभऋषी. तेव्हा त्यांनी आपले पशुप्रमाणे लिहून ठेविले झाले. ते गेले करून पण निस्तरणे आले स्त्रियांचे कपाळी."*

ताराबाई पुरुषजातीला म्हणतात, तुम्ही धैर्यवान, महाप्रतापी, व्युत्पन्न, आहात, हे मला मान्य आहे. वीज, वारा, अग्नीसारखी महाभुतेदेखील तुम्ही ताब्यात आणली. मोठेमोठे शोध लावून यंत्रांची निर्मिती केली. असे तुम्ही महापराक्रमी असताना स्त्रियांनाच दुःखाच्या खोल दरीतून वर काढण्याचा पराक्रम तुम्ही का करीत नाही?

त्या काळी पुण्यात सुधारणेच्या नावाखाली होणाऱ्या सभांचीही ताराबाईंनी अशीच उपहासपूर्ण वर्णने केली आहेत. नुसत्याच शालजोड्या आणि लफ्फेदार पागोट्या झोक मिरवत गुलाब-अत्तर, पान-सुपारी, हार-तुरे यांचा नाश करीत आहात. स्त्रियांच्या सुधारणेच्या संदर्भात कोणतेही ठोस निर्णय घेऊन त्याचे आचरण न करता नुसता सुधारणेचा देखावा निर्माण करीत आहात, असे सांगून त्या स्पष्टपणे म्हणतात,

*"या अशा तुमच्या पोकळ सभा तर तीस-पसतीस वर्षांपासून चालल्या आहेत. उपयोग काय? तुम्ही तुम्हाला आपल्या ठिकाणी धन्य मानून घ्या. पण पाहू गेले असता अजागल स्थानाप्रमाणे निर्जीव आहात."*

स्त्री आणि पुरुष या दोघांचीही निर्मिती परमेश्वराने परस्परपूरकच केलेली आहे. एकाशिवाय दुसऱ्याच्या अस्तित्वाला अर्थच उरत नाही. दोघांचेही अस्तित्व सारखेच महत्त्वाचे आहे. स्त्रीविरहित पुरुषाला तुम्ही सर्व प्रकारची सुखं उपलब्ध करून दिलीत तरी त्याला अर्थ उरणार नाही, असे ताराबाई म्हणतात. सर्व ऐश्वर्याने भरलेला राजवाडादेखील स्त्रीशिवाय निव्वळ भूतखाना वाटेल. स्मशानवत् वाटेल. सीताविरहित रामचंद्राचे दर्शन अगस्तीनेदेखील घेतले नाही. जेव्हा सीता रावणाने पळवून नेली तेव्हा हा जगन्नायकदेखील केविलवाणा होऊन हाय हाय करायला लागला. दिनवाणा, भिकारी होऊन अरण्यात रडत फिरायला लागला. हे ऐकले म्हणजे स्त्रीच्या अस्तित्वाशिवाय पुरुषाला अर्थ नाही, असे सांगून ताराबाई म्हणतात,

*"अरे, तलवारीने, शस्त्रांनी कोणीही कोणाला घायाळ करीलच करील, यांत काही मोठा पुरुषार्थ नाही. पण जे कोणी नुसत्या दृष्टींनी दुरून पाहिल्याबरोबर हाय हाय करण्यास लावील ते खरे. तेव्हा आता जास्त पराक्रमी कोण? ती स्त्री किंवा तुम्ही?"*

खरे तर स्त्री पुरुषावर किती प्रेम करते. त्याला जीव लावते. त्याची बेइज्ज़ती होऊ नये म्हणून जपते. त्याच्या नावाला बट्टा लागू नये म्हणून काळजी घेते. स्त्रीला अबला म्हणणारा पुरुष तरी काय स्त्रीशिवायच सबळ झाला काय? तिच्या सुवर्णकुचकुंडलातले अमृत पिल्याशिवाय कोणत्या पुरुषाची वाढ झाली आहे? पुरुषाच्या जडणघडणीत एवढा मोठा वाटा असलेल्या स्त्रीच्या वाट्याला पुरुषाने काय दिले तर आजन्म बंदिवास, गुलामगिरी आणि लाचारीचे जिणे.

लग्नानंतर एखाद्या बाईचा नवरा मेला तर तिला अपशकुनी, पांढऱ्या पायाची म्हटले जाते. तिच्या आयुष्याचे धिंडवडे काढले जातात. आता बायकोआधी नवऱ्याने मरावे किंवा नवऱ्याआधी बायकोने मरावे,

अनुक्रमणिका

याचा काय कुणी परमेश्वरापासून दाखला आणला होता काय? असा खडा सवालही ताराबाई विचारतात. कुणाला केव्हा मरण येईल ते का सांगता येते? मरण काय वय, वैभव, जात-पात, पाहून येते काय? ते आले की कुणालाही जावेच लागते! तो ईश्वराघरचा मळा आहे. तेथे स्त्रीचे कोण ऐकतो? असे असेल तर पुरुषाच्या मरणाला स्त्रीच का कारण धरली जाते? असे अनेक तर्काला पटणारे प्रश्न ताराबाई विचारतात. बुद्धीला पटणारे तर्क ताराबाई उभे करतात आणि पतीप्राणासाठी थेट यमदरबारात धडक मारणाऱ्या सावित्रीचे उदाहरण देऊन विचारतात,

*"स्त्री जातीत सावित्री तरी आपले पतीचा प्राण परत आणण्याकरिता यम-दरबारात जाऊन आली. पण पुरुषामध्ये कोणीतरी आपल्या बायकोचे प्राणाकरिता यमराजाचे दरबारात तर नाहीच पण उगीच त्या दरबाराचे वाटेवर तरी गेलेला कोठे ऐकण्यात आला आहे काय? तर जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यांपेक्षाही महाजबर अपराध्याप्रमाणे काळी करून सर्व आयुष्यभर अंधारकोठडीत राहावे, त्या प्रमाणे तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंड काळे करून दाढ्या मिशा भादरून यावत् जन्मपर्यंत कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे? एक बायको मेली की तिचे दहावे दिवशीच तुम्ही दुसरी करून आणावी. असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे तो दाखवा बरे. जशी स्त्री तसेच पुरुष. तुमच्यामध्ये मोठे अलौकिक गुण कोणते? तुम्हीच कोण असे मोठे शूर म्हणून देवांनी तुम्हाला इतकी मोकळीक दिली?"*

स्त्रियांना अबला म्हणून पुरुष नेहमीच स्वतःच्या सबलतेची बढाई मारताना दिसतात. पुरुषांच्या पराक्रमाची रसभरीत वर्णने केली जातात. यावर ताराबाई विचारतात,

*"जोवर तुमचा शूरपणा आजमावून पाहिला नाही तोपर्यंतच त्याचा आब. झांशीच्या राणीसारखा चार-पाचशे स्त्रिया झाल्या तरी त्यापुढे तुमचा पराक्रम टिकणार नाही. अशा पराक्रमी स्त्रियांना संधी मिळाली तर तुमची जी दुर्दशा उडेल तीमुळे तुम्हाला चुलीजवळसुद्धा लपायला जागा मिळणार नाही," असा टोमणाही ताराबाई मारतात. ताराबाईनी पुरुषांच्या पुरुषत्वाच्या इतिहासाचा उतरता आलेखच तीन शब्दात मांडला आहे. त्या म्हणतात, "पूर्वी पराक्रमी वीरबहाद्दूर माणसं होती. इंग्रजांचे राज्य आल्यापासून त्यांची बहादुरी संपली आणि ते कलमबहाद्दर झाले. आणि अलिकडे तर त्यांचे पुरुषत्व भाकरीबहाद्दूर एवढेच उरले आहे."*

वीरबहाद्दर, कलमबहाद्दर, भाकरीबहाद्दर या तीन शब्दांत महाराष्ट्राचा इतिहासच जणू ताराबाईंनी गुंफला आहे.

यावरही ताराबाई मान्य करतात की, तुम्ही पुरुष ज्ञानी, धर्मशील, परोपकारी, कनवाळू असे सर्वगुणसंपन्न, बत्तीस लक्षणी पुतळे आहात. मग स्त्रियांशी वागतानाच तुमची भूतदया कुठे लोप पावते? तिचा सर्वनाश होतो आणि तुम्ही तिच्याशी एकदम क्रूर कृत्य करू लागता?

*"अरे तुम्ही म्हणतांना की, आपल्या जीवावरून दुसऱ्याचा जीव जाणावा. मग येथे तुमचा जीव कोठे जातो. तुमचा जीव जसा तुम्हाला प्यारा आहे तसा स्त्रियांचा त्यांना नसेल काय? स्त्रिया दुसऱ्या मातीच्या, दगडाच्या नाहीत तर लोखंडाच्या बुकणीच्या केल्या असतील. तुम्ही व तुमचा जीव हे अगदी गाळीव सोने स्त्रिया काय अगदी यःकश्चित प्राणी ढेकूण नाही तर पिसूं असे तुम्हाला वाटते; व हे तुमचे अनुभवाप्रमाणे*

*अगदी बरोबर आहे. कसे जर म्हणाल तर पतिराज एकदा स्वर्गवासी झाले म्हणजे या बाईसाहेबांचे हाल कुत्रे खात नाहीत. त्यांच्या कपाळी मग काय? माथ्यावरील एकदा सर्व कुरळे केसावर नापिकाचा हात फिरला म्हणजे तुमचे डोळे थंड झाले. सर्व अलंकार गेले. सुंदरपण गेले. सारांश, तिला सर्व तऱ्हेने उघडी करून देशोधडी केल्याप्रमाणे नागवून सांदीचे खापर करावयाचे. तिला कोठे लग्नकार्यांत, समारंभांत, जेथे काही सौभाग्यकारक असेल तेथे जाण्याची बंदी. ती बंदी का? तर तिचा नवरा मेला. ती अभागी, करंट्या कपाळाची. तिचे तोंड पाहू नये. अपशकुन होतो. मग ही विशेषणे तिला! अरे पण तिचा पती मेला. नाही कोण म्हणतो? पण तो तिने का मारिला? देवांजवळ, "या नवऱ्याला देवा तुम्ही लवकर न्या हो." असा काही तिने अर्ज का केला होता? कदाचित 'या स्वारीला देवा तू लवकर ने, मला याच्या काचांतून सोडीव' असेही देवाजवळ एक वेळ करुणा भाकील पण हे राजश्री यमनगरीत गेल्यावर यांचे पाठीमागे आपली कशी दुर्दशा होईल या धास्तीने तरी ती अशी प्रार्थना करणार नाही... त्याची आयुष्यमर्यादा संपली, बाजार झाला. तो आपले बरे-वाईटाचे घेणे देणे करून चालता झाला. याचा दोष त्याचे बायकोकडे कशाकरिता?"*

वरील दीर्घ उतारा मुद्दामच दिला आहे. कारण ताराबाईंचे म्हणणे त्यांच्याच शब्दात जास्त परिणामकारक वाटते. त्या भाषेची एक खास शैली आहे. जुन्या वळणाची वाक्यरचना. श्यामच्या आईची आठवण करून देणारी शब्दकळा आणि ताराबाईंचे अस्सल युक्तिवाद त्यांच्यात शब्दात आणखी चांगले वाटतात. ताराबाईंचे गद्य वाचत असताना लीळाचरित्राची आठवण आल्याशिवाय राहात नाही. तशीच भाषाशैली, स्वभावरेखन, भाषेतला जिवंतपणा. एकदा चक्रधरांकडं विधवा असलेली एक स्त्री आपल्या विधवा झालेल्या दोन तुरुण मुलींना घेऊन आली आणि आयुष्याची कथा सांगून रडू लागली. चक्रधरांनी तिला धीर दिला आणि जगण्याचा आधार दिला. मूळातूनच पाहण्यासारखी ती लीळा अशी,

*"सर्वजे म्हणीतले, बाई कोणीकडोनी येत असीजे : जसमाईसे म्हणीतली, जी जी वसमती कडौनीः मग अवघी गोष्टी गोसावियापुढा सांगितली : ऐसी अनमोदो अनमोदो दुःख करू लागली : सर्वज्ञे म्हणीतले, बाई दुःख न किजे : दुःख म्हणीजे पाप : पापातव नरक होती : सोनेयाची फळी पोटेसी बांधौनी समुद्रातु रिगालेया काई तरीजैल बाई : ते बुडकिलय की :"*

चक्रधरांची ही लीळा आणि ताराबाईंच्या वरील उतारा यांची अवश्य तुलना करून पाहावी. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने तुलना करून पाहावी. ताराबाईंच्या उताऱ्यात 'सांदीचे खापर' असा एक शब्द आलेला आहे. तो फार गहन अर्थ व्यक्त करणारा आहे. स्त्रियांच्या आयुष्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या दोन प्रतिमाच आहेत. स्त्रींचे जगणे म्हणजे चुलीत जळणारी धिपली किंवा सांदीचे खापर. स्त्रियांच्या वाट्याला एक तर चुलीतल्या धिपलीसारखे जळत राहणे नाहीतर सांदीच्या खापरासारखे उपेक्षित राहणे. सांदीचे खापर म्हणजे फुटलेल्या गाडग्याच्या बुडाचा मोठा तुकडा, ज्याचा उपयोग मुलांची किंवा म्हाताऱ्या माणसांची विष्ठा घराबाहेर नेऊन टाकण्यासाठी केला जातो. जेव्हा घरात घाण होते तेव्हाच त्याची आठवण होते आणि जेव्हा घाण नसते तेव्हा त्या खापराला पाहून घाणीची आठवण होऊ नये म्हणून ते सांदीकोपऱ्यात अशा ठिकाणी ठेवले जाते की कुणाच्या सहसा नजरेला पडू नये. शुभप्रसंगी किंवा पाहुणे आले असताना विशेष काळजी घेतली जाते.

विधवांच्या वाट्याला येणारे आयुष्य का यापेक्षा वेगळे असते? 'सांदीचे खापर' या एकाच शब्दात विधवांच्या वेदना किती नेमकेपणाने ताराबाईंनी व्यक्त केल्या आहेत ते आपल्या लक्षात येईल.

अनुक्रमणिका

ताराबाईंच्या निबंधामधला आणखी एक उतारा मी सविस्तर देणार आहे. यात आलेल्या जरठकुमारी विवाहाच्या वर्णनाची तुलना नाट्याचार्य गो. ब. देवल यांच्या 'शारदा' नाटकातल्या लालित्याशी आणि व्ही. शांताराम यांच्या 'कुंकू' या चित्रपटातल्या प्रत्ययकारितेशी अवश्य करून पाहावी. उताऱ्याच्या सुरुवातीला ताराबाईंनी शास्त्रकारांनी स्त्रियांशी केलेल्या दुजाभावाचा उल्लेख करून एक छान टोमणा मारून म्हाताऱ्यांच्या तोंडाला लग्न म्हटले की सुटणाऱ्या पाण्याचे कसे बहारदार वर्णन केले आहे ते मुळातूनच पाहण्यासारखे आहे.

*"जसे नवऱ्यामागे अगदी सर्व सृष्टी व्यापार सोडून 'हरी हरी, देव देव,' करीत बसावे. तसे पुरुषाने का बसू नये बरे? त्यानेच का दुसऱ्याने लग्न करून नांदावं? स्त्रियांवर त्या शास्त्रकर्त्यांची करडी नजर का? स्त्रियांनी त्या शास्त्रकर्त्यांचे घरास कधीकाळी आग लाविली होती वाटते. म्हणून त्याने एकदम एकीकरिता साऱ्यांना एकच कायदा लागू केला. तसा पुरुषालाही असा एकच लागू केला असतां तर बरे होते. पण असे कसे होईल? या कामात शास्त्रकर्त्यांनी तरी आपले अकलेचा फांटा लांब झोकून बरीच खर्ची घातली. ही तरी त्यांची मोठी कुशलताच. बरोबरच आहे. आज जर शास्त्रकर्त्यांनी "कोणत्याही पुरुषाने एक प्रथम विवाहित बायको मेल्यावर पुनः लग्न करू नये; करील तो मातृगमनीः त्याला जातिभ्रष्ट करावे." असे केले असते नि कदाचित् उद्यां शास्त्रीबोवांच्या बायका एकदम जात्या तर त्यांनाही मग लोक असेच "करंट्या कपाळाचे, याचे तोंड पाहू नका." यांना लग्नकार्यात येऊ न देतां गावाबाहेर मठात हुसकून लाविते. म्हणून उघडच दिसते की, त्यांनीही आपली पीडा टाळण्याकरिताच पुरुषजातीला एकपासून पाचशे बायका करण्याची परवानगी दिली. तेव्हा यांचे दैव फळफळले. यांची एक बायको मेली अगर ती बिचारी दुखणाईत आहे तोच दुसरीची तयारी. श्रीमंत असले तर मग काय 'आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास!' एक तर पैशाचे व दुसरे माणसांचे बळ अनुकूल. प्रतिकूल काहीच नाही. बुवा ऐंशी वर्षांचे केवळ पाप्याचे पितर असले तरी जवळ जे भोजनभाऊ, तोंडचोपडे असतील त्यांनी म्हणावे, "छे, महाराज, आपण का म्हातारे झालांत? कोण म्हणतो त्याचे दांत टाकीन पाडून." "अहो, पण केसांनी घात केला ना." "अहो सरकार, उद्यां जरासा कलप द्या की झाले. त्यात काय आहे?" "बरे असो, केसांचे होईल हो, पण या दांताळवाडीचा पत्तासुद्धा राहिला नाही. याला काही युक्ती काढा." "बरे महाराज उद्या अशी नामी एक त्या दंतवैद्याजवळून बत्तिशीच विकत आणतो. आपण तेवढी आपल्या मुखांत शिल्लक राहिलेली दाढ आहे, तेवढी मुखमार्जन करतेवेळी उपटून टाका म्हणजे झाले, त्यांत काय आहे. अहो आतांचे पंचविशीतले पोर का आपली बरोबरी करील? छे हा महाराज हे जुने हाड. नासके मिरे जोंधळ्याला हार जातील काय?" असे म्हटले म्हणजे झाले. महाराज फुगले, लागले चाळे करायला. डोक्याचे टक्कलाभोवती शिल्लक राहिलेले दहा-बारा केस, भोवया, मिशा अगदी पिंजलेल्या कापसारिख्या जरी पांढऱ्याशुभ्र झाल्या असतील तरी त्याला तीन रुपयांची कल्पाची पेटी आणवून दिवसातून तीनदा कलप. लेपावर लेप चढवावयाचे. पट्टीदार मोठे आखडून धोतर नेसायचे. पागोटे लफ्फेदार, अंगात तटतटीत अंगरखा हाडकावर बळेच घालावयाचा. खांद्यावर उपरणे, बोचऱ्या तोंडात उसणे दातांचे बखल बसवून खलबत्त्यांत विडा कुटून ती हाडाची बत्तिशी लालभडक करावयाची. पायात लाल जोडा, चालतांना कापरे येत असेल तर हातात विलायती काठी घ्यावयाची व दिवसांतून दहावेळ पौष्टिक बदामी वड्या, कोठे जिलिब्या, कोहाळेपाक हे खावून शंभरदा आरशांत तो गालाचे खळगे पडून विद्रूप झालेला मुखवटा न्याहाळून इतका नखरा करून ज्याला त्याला विचारायचे. "काय रे, मी आता काही बरा दिसतो का?" मग तेथे एखादा थट्टेखोर मतलबी असावयाचाच. त्याने म्हणावे, "छे महाराज आता तर बुवा तुम्ही की नाही, आपल्या गणपतरावच्या बरोबरीचे दिसतां, लग्न करा. घरात कोठे आमचा जीव लागत नाही, मग तुमचा कसा लागेल? अहो म्हण आहे, हगवणी बायको, नागवणी सोयरा.*

अनुक्रमणिका

*"मग काय महाराजाचे नजरेत रात्रंदिवस बायकोच. दुसरे काही नाही. झाले, असे करून करून एखाद्या कसाबाला गांठून त्याचे जवळून जशी एखादी बकरी वाघापुढे टाकण्यास विकत घ्यावी त्याप्रमाणे हजार दोन हजार देऊन सुरेख मृगनेत्रीचे लग्न या मढ्याबरोबर करून द्यावे. पुढे हे मढे घराचे बाहेर एके दिवशी शेवटी गंगातीरी गेले म्हणजे झाले. सरला यांचा संसार पुनः हीच आपली अवदसा. का हे सर्व खरे ना?"*

जणू काही एखाद्या कसलेल्या नाटककाराने संवादासह एखाद्या प्रसंगाचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे करावे तसे हे लेखन उतरले आहे. वरील उतारा वाचताना वऱ्हाडी बोलीचा ठसकाही जाणवत राहतो. कारण संवादात ही गोष्ट जास्त जाणवते.

एका बाजूला शास्त्र लिहून स्त्रियांना रौरौनरकात लोटणाऱ्या शास्त्रीपंडितांची ताराबाई अशी चेष्टा करतात तर दुसऱ्या बाजूला स्त्रियांच्या सुखाचे कायदे करणाऱ्या इंग्रजांचे त्या कौतुक करतात. याचा अर्थ असा होत नाही की ताराबाई देशभक्त नव्हत्या. त्यांच्या देशभक्तीची उदाहरणं त्यांच्या लेखनात जागोजागी सापडतात. एकूण जनतेपैकी ऐंशी टक्के असलेल्या स्त्री-शुद्रांना गुलामीत ठेवू पाहणाऱ्या स्वातंत्र्य कल्पनेवर मात्र ताराबाईंचा विश्वास नव्हता. म्हणून विजयालक्ष्मी खटल्याच्या निमित्ताने सुरू झालेल्या चर्चेत कुणीतरी म्हणाले की, स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी मिळाली तर असे अनर्थ निर्माण होणार नाहीत. यावर चिडून परंपरावाद्यांनी इंग्रजांविरूद्ध गहजब उठविला. आमच्या धर्मविषयक धोरणात सरकारांनी तोंड खुपसू नये, असे म्हटले. त्यावर चिडून ताराबाईंनी लिहिले,

*"अरे, तुम्ही असे अट्टल हुशार कोल्हे. तरी इंग्रज सरकारचे ईश्वर असे सदोदित चिरकाल राज्य कायम ठेवो. हा राजा (शककर्ता) झाल्यापासून स्त्रियांना विद्यादान देवून त्यांची मने नेहमी सर्व मानसिक व व्यावहारिक प्रसंगांत धैर्यानं राहण्यास पुष्कळ तऱ्हेने बळकट झाली आहेत. त्यामुळे त्यांचे हृदयांत जे अज्ञान वसत होते ते जाऊन त्यांना आता आपले बरे-वाईट, कोणाशी कसे वागावे; हा संसाराचा गाडा कसा हांकावा, सत्यता, स्वधर्म, पातिव्रत्य या विषयी त्यांना चागले समजूं लागले व यामुळे आपले या भारतखंडाची काही दिवसांनी स्थिती अगदी बदलून जाईल. तरी जे कोणी पुणेवैभवासारिखे स्त्रियांचे हाडवैरी आहेत त्यास हे अगदी आवडत नाही असे त्यांचे एक-दोन पत्रांतील मजकुरावरून वाटते.*

*"...वैभवराव म्हणतात की, "आजपर्यंत सरकारने जे जे कायदे केले ते ते केवळ चंचूप्रवेशाप्रमाणे केले." तेव्हा या त्यांच्या लिहिण्यावरून तुम्ही राजद्रोही कृतघ्न आहांत. "विधवांचे केशवपन केले तर बावनखणीसारख्या शेकडो गृहशाला व विजयालक्ष्मीच्या थाटासारिखे खटले तोडण्याकरिता सरकारला अनेक नवी कोर्टे तयार करणे प्राप्त होईल." तर बावनखणीसारख्या गृहशाला बांधण्याऐवजी, सरकारास एक एकीकरिता एक एक लहानसे गोजिरवाणे घरच बांधावे लागेल, व तुमच्याकरिता बरिक एक मोठे टोलेजंग कारागृह करणे भाग पडेल. कसे म्हणाले तर जिचा जिचा सरकार पुनर्विवाह करून देईल ती ती त्या लहानशा गृहराष्ट्रांत आपल्या नूतन पतीबरोबर आनंदांत राहून सरकारास आजन्मपर्यंत कल्याण इच्छील व त्या विशाळ चिरेबंदी कोटांत ह्या व्याघ्ररूपी कामांध मद्य प्राशनाने धुंद व मांसाहाराने तुंद झालेल्या बोकडास ठेवून सांठवील तर सरकारास थोड्या खर्चात लक्षावधी नरपशूपासून कामे घेता येवून, गरीब बिचारे बैल, हेले, घोडे व गाढव यांना आता सांप्रत जे कष्टामुळे हाल सोसावे लागतात ते न लागून सरकारास पुण्यप्राप्तीची व आपला खजिना भरण्याची एक पर्वणीच येईल."*

अनुक्रमणिका

इंग्रजांच्या सर्व प्रकारच्या सुधारणांचे ताराबाईंना कौतुकच होते. स्वतःच्या धर्मासंबंधी कट्टर असणाऱ्या हिंदूंनी इंग्रजाचे सर्व प्रकारचे अनुकरण केले. कपडे, खाणे, पिणे, शानषौक सर्व स्वीकारले पण त्यांच्या सुधारणा मात्र स्वीकारल्या नाहीत. या उलट इंग्रजांनी मात्र तुमचे काहीच स्वीकारले नाही, असे ताराबाई म्हणतात. या देशाला अलीकडच्या काळात मनुष्यत्वाची कळाच शिल्लक राहिली नव्हती ती इंग्रजांनीच प्राप्त करून दिली असाही ताराबाईंचा विश्वास होता. मराठेशाहीनंतरच्या बेबंदशाहीत मारणे आणि मरणे हे दोनच राक्षशी गुण तुमच्यात शिल्लक राहिले होते. ती बेबंदशाही मोडून काढून एक सुघटित राज्यव्यवस्था इंग्रजांनीच इथे सुरू केली.

*"नानाप्रकारचे कलाकौशल्य, कायदेकानु, ठिकठिकाणी कचेऱ्या, दरबार करून सर्व स्वस्थता राखिली. डोंगर फोडून आगगाडीसारखा महान विशाल अग्निरथ त्यांतून जाण्यासारिखे मार्ग पाडिले. कधीकाळी द्वापारयुगांत वेरूळ, अजिंठा, कारले, नाशिकजवळ हे माझ्या माहितीतले; पण पृथ्वीतलावर अशी लाखो लेणी आहेत. ती पांडवांनी अज्ञातवासांत फिरत असताना कोरिली असे हल्लींचे लोक म्हणतात. तरी ते पांडव ती द्रौपदी पाहिली कोणी. पण आता हे शककर्ते बरीक खरे पांडव आहेत. पोथीत रामविजयात इंद्रजिताने हवन करून अग्नितून रथ काढला होता असे श्रीधरस्वामीने लिहिले. पण तो रथ या सध्या चालू अग्निरथाप्रमाणे अगणित ओझे नियमित वेळी नियमित ठिकाणी वाऱ्यासारिखा नेऊन पोचवीत नसेल. असे अनेक प्रकारचे अद्भूत चमत्कार जितके वर्णावे तितके थोडेच. रात्रीस सोन्याचे गोळे पाठीशी बांधून चालले जा. कशाची भीती नाही. असे जे हे सरकार त्याने तुमच्याकरिता तर सारेच सुखोपचार केले आणि त्यांनी या धर्मांत हात घालून, अबलास सबला करून त्यांना तुमच्या या पोकळ धर्मरूप यातनेतून त्यांनी न सोडवावे तर मग कोण सोडवील बरे!"*

वरील लेखनावरून आपणाला ताराबाईंच्या लेखनाची दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये लक्षात येतात. एक तर ताराबाईंना वैज्ञानिक प्रगतीविषयी प्रेम व आपुलकी आहे. म्हणून तर त्यांनी पुराणातल्या वांग्यापेक्षा प्रत्यक्ष समोर धावणाऱ्या रेल्वेचे कौतुक केले आहे. त्यामुळे सामान्यांना प्राप्त झालेल्या सुविधा किती प्रगतीकारक आहेत ते त्यांनी सांगितले आहे.

आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ताराबाई इंग्रजांनी डोंगर फोडून केलेल्या रेल्वेमार्गाची तुलना प्राचीन वैभवशाली लेण्यांशी करतात. आणि सांगतात की, प्राचीन काळातल्या वेरूळ-अजिंठ्याच्या लेण्या कुणी खोदल्या आणि त्यांचा तसा जीवनोपयोग काय? पण या आधुनिक लेण्यांनी माणसाला सुखसोई मात्र प्राप्त झाल्या आणि मानवाने पाऊल प्रगतीच्या दिशेने पडले. सतत पुढचा विचार करणाऱ्या ताराबाईंना या वैज्ञानिक प्रगतीविषयी आपुलकी व प्रेम वाटणे स्वाभाविकच होते.

स्वभावाप्रमाणे ताराबाई अत्यंत कोमल मनाच्या आहेत. लग्न होऊन एकदम परक्या माणसात जावं लागणाऱ्या मुलीच्या भावना किती वेदनादाई असतील याची कल्पना त्यांना सासरी न जाताही आलेली आहे. आईवडिलांनी अत्यंत लाडाकोडात वाढवलेली मुलगी पुढं कुणाच्या तरी राकट हाताखाली नांदायला जाते. जिला फुलाप्रमाणे वागवायला पाहिजे तिच्याशी हा राक्षसासारखा व्यवहार करतो. इकडं जवळ घेणारे हात, तर तिकडं दूर सारणारी लाथ. इकडं खोबरेल तेल डोक्यावर टाकून न्हावू घालणं तर तिकडं डोक्यावर रॉकेल टाकून पेटवून देणं तीच कुणाची तरी आई आणि तीच कुणाची तरी सासू. पण भूमिका बदलली की जमीनअस्मानाचं अंतर.

अनुक्रमणिका

माय म्हणता म्हणता
ओठ ओठालागी भिडे
सासू म्हणता म्हणता
किती अंतर हे पडे

बहिणाबाई चौधरी यांच्यावरील ओळीत हे माय आणि सासू यांच्यातलं अंतर नेमकेपणानं नोंदवलं गेलेलं आहे.

बाहेरून कमावून आणण्याचं काम पुरुष करत असला तरी त्याचा नीट विनियोग करण्याचं काम स्त्रियाच करतात. घराचं व्यवस्थापन ही काही सोपी गोष्ट नाही, पण त्याचंही श्रेय त्यांना नीट दिलं जात नाही. ताराबाई म्हणतात, पुरुषानं त्यांच्या कामाचं थोडं जरी कौतुक केलं तरी स्त्रिया किती सुखावून जातील. त्यांना किती आनंद होईल. पुरुष तसं करत नाहीत. कौतुकाच्या भुकेल्या असलेला स्त्रियांची भूक भागविली जात नाही. त्यांना कायम दूषणं दिली जातात. त्यांचा कायम छळ करण्यात येतो.

वैतागली गोरी
गेली आरोन्या वनाला
काय करावं मनीती
याच्या निकरटपणाला
वैतागली गोरी
गेली जीवद्याया हिरी
मनी निकरट
तिथं वळीतय दोरी.

या स्त्रियांच्या लोकगीतात म्हटल्याप्रमाणे कायम वैतागलेली गोरी आणि मनीचा निकरट पुरुष हेच हजारो वर्षं इथल्या स्त्रियांचं भागधेय होतं. त्याकडं कुणाची लक्षही गेलं नाही.

*"स्त्रियांना पुष्कळ तऱ्हेचे दोष दिलेले वाचण्यांत व रोजच्या वहिवाटीत ऐकूं येतात. पण जे दोष स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत अजिबात नाहीत काय जशा बायका लबाडी करितात तसे पुरुष करीत नाहीत काय? चोरी, शिंदळकी, खून दरोडे, दंगाबाजी, सरकारी पैसा, लांच खाणे, खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे करणे, यांतून एकही अवगुण पुरुषांत नाही काय?"*

असा खडा सवाल ताराबाईंनी विचारला आहे. भर्तृहरीच्या त्रिशतकातला एक श्लोक देऊन त्यात स्त्रियांना लावण्यात आलेल्या सर्व दोषांचा प्रतिवाद आपल्या पुस्तकाच्या उत्तरार्धात ताराबाईंनी केलेला आहे. त्या आधी श्रीधराच्या एका ओवीचा दाखला ताराबाई देतात आणि त्याचा प्रतिवाद कसा करतात ते आधी आपण पाहू आणि मग भर्तृहरीच्या आक्षेपाविषयी ताराबाई काय प्रतिसाद करतात ते पाहू.

*स्त्री केवळ कुऱ्हाडी ॥*
*सबळ वृक्ष तोडी ॥*
*प्राणी नाडिले लक्षकोडी ॥*

अनुक्रमणिका

*मूर्तिमंत भवव्याधी कामिनी जाणवा ॥१॥*

या ओळीचा प्रतिवाद करताना ताराबाईंनी लिहून ठेवलेले आहे की,

*'स्त्री जर कुऱ्हाडीसारखे तुमचे पुण्यवृक्ष तोडिते तर अशा या प्राणघातक कुऱ्हाडीस प्राणापेक्षा चाहून तिचे पोषणार्थ तुम्ही आपले जन्मचे जन्म का ताबेदारीत व हरएक प्रकारचे व्यावहारिक कामांत बैलासारिखे राबून घालवितां; तुमच्यापेक्षां बैल बरा. त्याला त्याची स्वतःचीच काळजी. मग तिकडे काही होवो."*

आता आपण भर्तृहरीचा तो प्रसिद्ध संस्कृत श्लोक आणि त्यात स्त्रियांना दिलेली दूषणे आणि त्याचा ताराबाईंनी केलेला प्रतिवाद सविस्तर पाहूया.

*आवर्तः संशयानामविनयभुवनं पत्तनं साहसानां ॥*
*दोषाणां सन्निधानं कपटमयतरं क्षेत्रमप्रत्ययानां ॥*
*स्वर्गद्वारस्यविघ्नं नरकपुरमुखं सर्वमाया करंडं ॥*
*स्त्रीयंत्रं केनसृष्टं विषयममृतमयं प्राणिनां मोहपाश ॥*

या संस्कृत श्लोकात स्त्रियावर नऊ आरोप ठेवण्यात आलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे :

१. स्त्रीरूप यंत्रामध्ये जारणमारणापेक्षा बलिष्ठता आहे.
२. स्त्रिया अनेक संशयाचा परिभ्रम भोवरा आहेत.
३. स्त्रिया उद्धततेचे केवळ गृहच आहेत.
४. स्त्रिया अविचारकर्माचे आगर आहेत.
५. स्त्रिया सकल दोषांचे निधान आहेत.
६. स्त्रिया शतशः कपटांनी व्यापलेल्या आहेत.
७. स्त्रिया दुर्गुणांचे उत्पत्तिस्थान आहेत.
८. स्त्रिया म्हणजे स्वर्गद्वाराचा नाश करणारे यमनगरीचे द्वारच आहेत.
९. स्त्रिया म्हणजे सर्व कपटलीलांनी युक्त असे पात्र आहेत.

स्त्रीजातीवर घेण्यात आलेल्या वरील आरोपांचा ताराबाईंनी कडक शब्दांत प्रतिवाद केलेला आहे. आणि हा प्रत्येक दोष स्त्रियांपेक्षाही पुरुषातच कसा दिसतो ते सिद्ध करून दाखवलेले आहे.

स्त्रीरूप यंत्रामध्ये जारणमारणापेक्षाही जास्त बलिष्ठता आहे, हा त्यातला पहिला आक्षेप. जणू काही स्त्री म्हणजे जादूची पुडीच आहे. चेटकीण, हडळ या काही कल्पना त्यांपैकीच म्हणाव्या लागतील. ज्या निरागस जिवांना फसवून आपला स्वार्थ साधून घेतात. आजही, अगदी ताराबाईंनी पुस्तक लिहून सव्वाशे वर्षं झाली तरी, विज्ञानाने इतकी प्रगती केली तरी, अजूनही अधूनमधून वृत्तपत्रात बातम्या प्रसिद्ध होतात की हडळ समजून गावातल्या लोकांनी एका वांझेला दगडांनी ठेचून मारले.

अनुक्रमणिका

असे कृत्य करण्याच्या पाठीमागे स्त्रियांविषयीचा ताराबाईंनी सांगितलेला वरील गैरसमजच कारणीभूत आहे, हे आपल्या लक्षात येईल. या आक्षेपाचे खंडण करताना ताराबाई म्हणतात की "स्त्रीपेक्षा बलिष्ठतेत पुरुषाचाच क्रमांक वरचा असताना स्त्रियांवर असा अक्षेप घेणे म्हणजे निव्वळ द्वेषबुद्धीचाच भाग आहे".

स्त्रियांवर घेण्यात आलेला दुसरा आक्षेप म्हणजे स्त्रिया अनेक संशयाचा परिभ्रम भोवरा आहेत. याचा प्रतिसाद करताना ताराबाई म्हणतात,

*"स्त्रिया अनेक संशयाचा परिभ्रम भोवरा हे खरे! कारण त्या अशिक्षित असल्यामुळे हर एक प्रकारचे संशय त्यांचे मनात वास करितात. तरी त्यांच्या मनांतला संशय फक्त त्यांच्या संबंधापुरताच असते. पण तुमच्या मनांतले संशायाचे चक्र जर पाहू गेले तर त्यावर नजरसुद्धा ठरणार नाही. तुमची मने नानाप्रकारची देशी व परदेशी मानसिक व व्यावहारिक दगाबाजीने अगदी संभ्रमित असतात."*

पुढे ताराबाईंनी पुरुषांच्या संशयाचे काही नमुने सांगितलेले आहेत. पुरुष पुरुषाला आणि स्त्रीला आपला संशयाच्या भोवऱ्यात कसा पकडतो, तेही सांगितले आहे. सत्यदर्शन हा ताराबाईंच्या लेखनाचा मूळ गाभा असल्यामुळे त्यांनी स्त्रीजात संशयी आहे हे मान्य करून टाकले आहे. परंतु या संशयी स्वभावाला कारणही पुरुषच आहे हेही आवर्जून नमूद केले आहे. "पुरुषांनी वर्षानुवर्षे ज्ञानाचे किरण स्त्रियांपर्यंत पोहोचूच दिले नाहीत. त्यामुळे त्या अज्ञानाच्या अंधारात तशाच खितपत पडल्या. बाहेर ज्ञानाच्या प्रकाशाच्या जगात काय चालले आहे त्याचा पत्ताच पुरुषांनी यांना लागू दिला नाही." म्हणून त्यांच्या स्वभाव संशयी बनला, असे ताराबाईंना वाटते. यापुढेही जाऊन सत्याचे दर्शन घडविताना ताराबाई लिहितात,

*"या जगांतील सर्व स्त्रिया प्रखर सूर्याच्या तेजाप्रमाणे सतेज, अंतर्बाह्य गंगाजलाप्रमाणे निर्मळ आहेत असे मुळीच नाही. पण सर्व पृथ्वीतील स्त्रिया गोळा केल्या तर संशयाचे भोवऱ्यात सापडलेल्या शेकडा दहा सापडतील. पण तुमच्यांत एक देखील या भोवऱ्यांने वेगळा सापडणार नाही."*

आज विकसित झालेल्या मानसशास्त्राचा आधार घेऊनही आपणाला हेच सिद्ध करता येईल की, ताराबाई म्हणतात त्याप्रमाणे पुरुष संशयावेगळा असत नाही. स्त्रियांइतकाच तोही संशयी असतो.

स्त्री-जातीवर घेण्यात आलेला तिसरा आक्षेप म्हणजे उद्धततेचे केवळ गृहच. याचा प्रतिवाद करताना ताराबाई फार खोलात गेल्या नाहीत. 'यात आपली जाति काय कमी आहे, वजन करू गेले असता शंभर दीडशे तोळे पारडे खालीच जाईल.' अशी दोनच वाक्य लिहून ठेवली आहेत.

खरे तर स्त्रियांना उद्धट म्हणणे म्हणजे अतीच झाले. कारण स्त्रिया तर नम्रतचा आणि शालीनतेचा आदर्श असतात. असे असतानाही स्त्रियांवर वरील आक्षेप घेतला जावा, यात भार्तृहरीसारख्या विचारवंताचा अविचारीपणाच सिद्ध होतो.

अनुक्रमणिका

स्त्री-जातीला लावण्यात आलेला चौथा दोष म्हणजे स्त्रिया अविचार कर्माचे नगरच आहेत. याचे सविस्तर खंडन-मंडन ताराबाईंनी केले आहे, ते मुळातूनच पाहण्यासारखे आहे. ताराबाईंनी लिहून ठेवले आहे,

*“स्त्रियांचेच हातून अविचार घडतात? आणि तुम्ही पाजी, बेइमान भरवसा देऊन केसांनी गळा कापणारे जे तुम्ही त्या तुमच्या हातून कधीच अविचार होत नाही? तुम्ही अगदी विचारमंदिरे. अहा रे शाब्बास! अरे, तुम्ही महापढीक शहाणे व विचारी असून तुमचे हातून न भूतो-न भविष्यति, असे अविचार घडून व रोज घडत असतांही तुम्ही मोठे विचारी म्हणवितां याला काय म्हणावे?”*

*“स्त्रिया केवळ गोठणांतील म्हशीप्रमाणे मूर्ख. त्यांना ना लिहिणे ना वाचणे म्हणून का ईश्वराने यांना काहीच बुद्धी दिली नसेल काय? तरी त्या अविचारी असूनही तुमच्यापेक्षा बऱ्या. तुम्ही शहाणे आहात खरे. पण इकडे कारागृहात जावून पाहावे तो पाय ठेवण्यासदेखील जागा मिळत नाही. इतकी तेथे आपल्या देशबांधवांची दाटी असते. तेथे काय सर्व शहाणे. कोणी खोट्या नोटा केल्या म्हणून, कोणी लांच खाल्ला म्हणून, कोणी कोणाची बायको पळवून नेली, कोणी बंडांत सामील, कोणी कोणाला विषप्रयोग केला, कोणी राजद्रोह केला, कोणी खोटी साक्ष दिली, कोणी तोतया राजे बनून लोकांस बुडविले, कोणी खून केले, ही अशी विचाराची मोठमोठी कामे केली म्हणून सरकारने तुम्हाला मोठ्या आदराने या सुंदर बंदीशाळेसारख्या रंगमहालांत जागा दिली. पण असे अविचार कोणते स्त्रियांचे हातून घडतात बरे?*

*“असे किती कारागृह बायकांनी भरलेत दाखवा? जेथे तुमची दोन-तीन हजार मंडळी, त्यात फार झाले तर शंभरदेखील स्त्रिया निघणार नाहीत. स्त्रियांचे हातून मोठा अविचार कोणता तर परद्वार हेच काय ते मेरूचे शिखर. व याचेपायीच त्यांचे हातून अविचार होतो. पण जी परद्वार करते तिच्या मनांत ही दुष्ट वासना उत्पन्न करण्यास आधी पुढे पाऊल कोण टाकितो बरे? ती किंवा तुम्ही? स्त्री कितीही निर्लज्ज असली तरी ती होवून कधी परपुरुषांचे गळ्यात पडणार नाही. ही अगदी खात्री. स्त्रियांना सर्व जगिक सुख म्हणजे काय? एक तर प्रथम मनासारखा नवरा अत्यंत प्रीती करणारा. त्याचे तिचे एक चित्त असले तर ती दरिद्री असूं द्या, झोपडीत अन्नवस्त्राचे हाल, जांच सर्व प्रकारचे हालवनवास सोसून, फक्त त्या एका प्राण्यावर नजर देवून दुःखात सुख मानून या कृत्यास कधीच प्रवृत्त होणार नाही. बरे हेही कृत्य म्हणजे मोठे अविचाराचे मागे कधीच घडले नाही. तुम्ही शास्त्रांचे बळाने उड्या मारता. पण शास्त्रात जो घोटाळा आहे तो आता नाही.*

*“स्त्रियांची मने फार हलकी व अल्पसंतोषी असतात. तुमच्यासारख्या नित्य आपल्यास मोठा हुद्दा व पैसा कसा मिळेल, लोक आम्हाला मानमान्यता देवून, “या गोमाजी कापसे” असे कधी म्हणतील. नाना प्रकारची अशा आपल्याच घमेंडीच्या अनेक विचारांत बायका गुंतत नसतां आणि असाध्य कृत्ये साधण्यात आपले आयुष्याचे आयुष्य त्या घालवित नसतां तुम्ही नामानिराळे होवून अविचाराचे ओझे स्त्रियांचेच माथी मारता याला काय म्हणावे?”*

स्त्रियांवर लावण्यात आलेला पाचवा दोष म्हणजे, स्त्री-जात ही सकल दोषांचे निधान आहे. ताराबाईंच्या मते “स्त्रिया ज्या दोषाने वागतात त्यांच्या दोषाला पुरुषच जबाबदार असतात.” कारण स्वतः वडीलच आपल्या मुलींना पैसा आणि संपत्ती पाहून म्हाताऱ्यांच्या हवाली करतात. त्यांना वाटतं, नवरा मेला तरी निदान तिला खायला-प्यायला तर कमी पडणार नाही ना? मग नवरा असला काय आणि नसला काय? काय फरक पडतो”, पण ताराबाई म्हणतात त्यांना हे कळत नाही की पतीच्या शरीर सहवासाइतकी

अनुक्रमणिका

तिला रोजी-रोटीची आणि संपत्तीची गरज नसते. स्वतः बापानेच चूक करून अशा पाप्याच्या पितराच्या पदरात आपली पोटची पोर बांधली आणि हे पाप्याचे पितर तिच्या ऐन तारुण्यात नरकवासी झाले तर तिने आपल्या तारुण्याचे काय करावे? अशा वेळी ती जर काही दोषपूर्ण वागली तर तो दोष पुरुष असलेल्या तिच्या बापाचा नाही काय?"

सवतीवर मुलगी देणाऱ्या बापालाही ताराबाई अशाच खडसावतात. त्यांचं म्हणणं असं की, "स्त्री काहीही सहन करू शकते पण आपल्या प्रेमात वाटेकरू सहन करू शकत नाही. आणि पुरुष तरी दोघींना सारखी वागणूक देऊ शकतो काय? अशा वेळी जर त्या बाईकडून दोषपूर्ण वागणूक घडली तर त्याचा दोष कुणाकडे?"

राजघराण्यातल्या स्त्रिया हुजरे-बिजरे ठेवतात ह्या त्यांच्या दोषालाही पुरुषच कारणीभूत आहेत, असे ताराबाईंना वाटते. राजघराण्यातले पुरुष शेकडो बायका करतात. एकीकडे पाहायला त्यांना वर्ष-सहा महिने वेळ मिळत नाही. राजघराणेच असल्यामुळे भौतिक स्वरूपाची कुठलीच कमतरता नसते. अशा वेळी तर वासनेच्या ज्वाळा जास्तच भडकून उठतात. तेव्हा तो जाळ त्यांनी कसा विझवायचा? त्या अशा वेळी दोषपूर्ण वागल्या तर दोष कुणाचा?

असे अनेक सडेतोड प्रश्न विचारून आणि युक्तिवाद उभे करून ताराबाई या दोषाचे निराकरण करतात. या मुद्दाच्या खंडणातच पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या दोषपूर्ण वर्तणुकीची निर्भत्सना केलेली आहे. त्यांनी लिहून ठेवलंय,

*"मग पुण्यास सार्वजनिक सभा आहे ना. त्यांनी स्त्रियांवर मोठाच उपकार करून त्यांचे जे दर सहा महिन्यांनी का वर्षांनी पुस्तक निघत असते त्यामध्ये मोठ्या डौलाने लिहिले होते की, "सरकार स्त्रियांना सती जाण्याची मोकळीक देईल तर बरे?" पण स्त्रिया सती जाऊन तुम्ही त्यांच्या मागे गवऱ्या वळायला का राहता? तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही त्यांच्याबरोबर का सती जाऊ नये बरे? तुमच्यापेक्षा ती सती गेल्याने फार नुकसान होईल; कसे म्हणाल तर ती मेली म्हणजे तिच्या मागे तिची लहान लहान मुले असतात त्यांना कोणी सांभाळावे?*

*"अरे, म्हण आहे, "घोडे फेरता बाप मरावा, पण राहटाने सूत कांतणारी आई मरू नये." बाप जर मेला तर ती आई पाहिजे तसे दुःख सोसून मुलांना पोशील; पण तुम्ही आज ती मेली की उद्या दुसरी करून त्या मुलास देशोधडी करता. करता की नाही हे? पाहा रोज बोंब ऐकूं येतेच. या करिता बायकोच्या आधी तुम्हालाच त्या कुंडांत टाकावे.*

*"...जशी एक घोडी मेली तर तुम्हाला दुसरी घेण्यास वेळ लागत नाही. तशीच दुसरी बायको करण्यास तुम्हाला आयास पडत नाही. एक मेली तर दुसरी तयार. गरीब असला तर तिला काही जपतो. कारण त्याला ठाऊक असते की, ही मेली तर दुसरी मिळणे कठीण. पण श्रीमंताजवळ तेदेखील नाही. श्रीमंत तर रोज नवरे व्हायला तयार असतात. पण त्यांच्या बायका नेण्याला यमराजाला रोज रिकामपणच नसते. नाहीतर तुम्ही रोज दिवसांतून तीनदां नवरे व्हाल यात संशय नको.*

अनुक्रमणिका

*“…असे बायका करतात काय? ती तर विपत्तीत तशीच सुपत्तीत तुमचे आज्ञेत मर्जीप्रमाणे वागतेच की नाही. का हा भिकारी, कुरूप म्हणून दुसरा करून जाते? आता इतके होवून कोण दोषी बरे, स्त्रिया का पुरुष? …तुम्हाला जशी वाईट, कुरूप, दुर्गुणी, घाणरेडी, गावंढळ बायको आवडत नाही, तसा बायकोला तरी या मासल्याचा नवरा आवडेल का? जशी तुम्हाला बायको चांगली पाहिजे, तसा तिला चांगला नवरा नको का?”*

ताराबाईंचे हे इतके निर्भीड व सडेतोड विचार तेव्हाच्या सत्यशोधकांनाही पटले नाहीत. म्हणून कृष्णराव भालेकर यांच्यासारख्यांनीही विरोधी अभिप्राय व्यक्त केला होता. कारण स्वतः भालेकर सत्यशोधक समाजाचे कट्टर पुरस्कर्ते असूनही त्यांनी असा पुनर्विवाह केला होता. ताराबाईंनी हा मजकूर आपला उपमर्द करण्यासाठीच लिहिला असावा, असा समज होऊन त्यांनी या लेखनावर टीका केली.

ताराबाईंच्या लेखनात अभिनिवेश नाही, असं आपणाला म्हणता येणार नाही. नव्हे, तो आहेच, असे आपणाला म्हणावे लागेल. परंतु ताराबाईंच्या युक्तिवाद उभे करण्याला आणि सत्याची कास न सोडण्याला दाद द्यावीच लागेल. म्हणून त्या स्त्रियांचे काही दोष मोकळेपणाने मान्य करतात. काही दोषाला पुरुषांना जबाबदार धरतात तर काही दोषांना परिस्थिती जबाबदार धरतात. पण प्रामुख्याने पुरुषही निर्दोष नाहीत हे दाखवतात. सडेतोडपणे दाखवतात, हे महत्त्वाचे.

स्त्रियांना चिकटविण्यात आलेला सहावा दुर्गुण म्हणजे, त्या शतशः कपट्यांनी व्यापलेल्या असतात. यावर खुलासा करताना ताराबाईंनी म्हटले आहे :

*“खरे तर शतशः कपट्ट्यांनी पुरुषच व्यापलेले आहेत. कारण कपट-कारस्थाने करण्यात नेहमी पुरुषत पुढे असतात. गोसावी, फकीर, हरदास, ब्रह्मचारी, साधू, दुधाहारी, गिरीपुरी, भारती, नानक, कानफाटे, जोगी, जटाधारी, नंगे इत्यादी सोंगे घेऊन जगाला फसवत फिरणाऱ्या काय स्त्रिया आहेत काय? ही सर्व सोंगे तर पुरुषच घेतात ना?”*

*“ब्रह्मचाऱ्याचे सोंग घेऊन अंतरी दर्शनाला येणाऱ्या सुंदरीचे चिंतन करणारा कोण बरे? पालखी, मेणा, हत्ती, घोडे इत्यादी श्रीमंत लवाजमा सोबत घेऊन निःसंगपणाचे सोंग करणारे कोण बरे? गळ्यात तुळशीच्या माळा घालून हरदास नावाचे प्रतिष्ठित भिकारी कोण बरे? संन्याशाचे सोंग घेऊन जोडव्यांच्या आवाजाकडे कान टवकारणारे कोण बरे?”*

असे अनेक प्रश्न विचारून पुरुषाचेच दात उपटून त्याच्यात घशात घालण्याचे निर्भीड काम ताराबाई करतात.

*“अरे, देवदेखील स्त्रियांचे मुळावर, मग तुम्ही असल्याचे काय नवल? कृष्णानी अर्जुनाकडून महंताचे वेषाने सुभद्रेचे हरण करविले तेव्हा यादवांची मुले ‘गोसाव्यांनी आत्याबाई नेली’ असे म्हणू लागली. पण आत्याबाईने गोसावी नेला असे तुम्ही कोठे ऐकिलेत का?”*

यानंतर राम आणि रावण दुष्ट वागले पण त्याचा दोष मात्र स्त्रीजातीवर आला याची त्यांनी उदाहरणे दिली आहेत. एकमेकांची प्रगती न पाहावण्याऱ्या व त्याच्या अधोगतीचे चिंतन करणाऱ्या पुरुषांचेही

अनुक्रमणिका

आपापसातले संवाद ताराबाई देतात. याउप्परही स्त्रीच्या हातून काही कापट्य घडले तर तेही पुरुषांनी घडवून आणलेले असते, हे सांगताना ताराबाईंनी लिहिले आहे,

*"नवऱ्याची ममता आपलेवरच असावी, त्याने निरंतर आपले मर्जीप्रमाणे राहावे, याकरिता कित्येक जोशी, कानफाटे, बैरागी, भोंदू लोक स्त्रियांना नादी लावून फसवितात. 'लेकुरवाळे घर पाहून शनिवारी पौर्णिमा साधून आग लाव म्हणजे तुला मुलगा होईल', 'शनवारी काळोख्या रात्री न्हाऊन डोक्यावर भंदे घेवून वस्त्ररहित अकरा मारुतीचे दर्शन घे', असे नाना प्रकारचे थोतांड ऐकून त्यावर त्यांचा त्वरित भरवसा बसून, त्या अशा प्रकारचे साहस फक्त मुलाचे आशेने आणि नवऱ्याची मर्जी आपणाकडे निरंतर रहावी या हेतूने करतात व त्यांची मने भोळी असल्यामुळे अशा कामांत सहजी गढून ते काम कितीही कष्टसाध्य असले तरी ते करण्यास त्या मागेपुढे पहात नाहीत. यावर त्या किती मूर्ख, अविचारी आहेत हे सहजी ध्यानांत येते. या उलट त्या तुमच्यासारख्या अट्टल शहाण्या असून मनाप्रमाणे सर्व सुखांत असूनही जर असे करित्या तर मग त्यांना दोष देणे बरोबर होते.*

*"आता मोहनी, तर स्त्रीजाती हीच मूर्तिमंत मोहनी आहे. स्त्री ही नखशिखापर्यंत मोहनाने भरली आहे. तिचे प्रत्येक अवयव, तिचा आवाज, चालणे, बोलणे, कामकाज यांत पावलोपावली ती दुसऱ्याचे मन आकर्षून घेणारा लोहचुंबक आहे. तिला पहाताच जशी मधमाशी मोहळाला लुब्ध होते तसेच पुरुषमात्र तिला लुब्ध होऊन भुलून जातात, यात स्त्रियांचा काय दोष बरे?"*

स्त्री जातीवर घेण्यात आलेला सातवा आक्षेप म्हणजे, स्त्री हे दुर्गुणांचे उत्पत्तिस्थान आहे. यावर प्रतिवाद करताना ताराबाई म्हणतात,

*"दुर्गुणांची उत्पत्ती खरे तर आधी पुरुषापासूनच होते, "स्वधर्म सोडून मन मानेल तसे वर्तन करणे, जुवा खेळणे, गांजा वगैरे ओढणे, रांडा ठेवणे इत्यादी वाईट व घाणेरडी आचरणे तुम्ही करू लागला.' असे ताराबाई म्हणतात. "स्त्रिया व्यभिचार करतात याला कारण तरी कोण आहे? कारण स्त्रियांना सुस्थिर घराच्या बाहेर पडणे कधीच शक्य नाही. त्यांना अस्थिर करून फसवून, भुलवून तुम्हीच घराबाहेर काढता, मग त्यांना रांड होण्याशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही." ताराबाई म्हणतात,*

*"रांडांची काही खाण नाही. स्त्रियांना तुम्ही प्रथम गोड गोड बोलून, नादी लावून, एकदा घराबाहेर घराचा उंबरा पारखा करून काढले, म्हणजे जोवर तारुण्याचा भर असतो तोवर कसे तरी ढकलून नेता नि मग तिचे नशीब तिचेबरोबर देऊन तिला सर्वस्वी नागवून सोडीता; तेव्हा ती हा निंद्य व्यापार अगदी उघडपणे हवा तसा करून आपल्यासारख्या दुसरीस करू पाहते."*

असे असतानाही पुरुष स्त्री-जातीलाच का दोष लावतो त्याविषयी ताराबाई युक्तिवाद करतात की,

"जशी ज्याची नजर तसे त्याचे निरीक्षण. जे स्वतःच पापी आहेत त्यांना सर्व जग पापीच दिसते. पुरुष स्वतःच पापी आहेत म्हणून त्यांना सर्व स्त्री-जातच पापी दिसते."

त्या नंतरही ताराबाईंनी लिहून ठेवलेले आहे,

अनुक्रमणिका

*“स्त्रिया आधीच आगीचा लोळ. त्यावर तेल, मग उजेडाला काय कमी? एक मशाल तर दहा दिवटे तिच्याभोवती जमावयाचेच. प्रथम त्यांना कसकसे भुलवून पुढची आशा दाखवून कशा कशा युक्तीने बाहेर काढल्यात. हे खरे वर्तमान एकीलाच पुसा, म्हणजे मग पहा कशी ती वाघिणीसारखी चौताळून तुमच्या नावाने कराकरा दांत खाईल. तर दुर्गुणापासून दुर्गुण उत्पन्न होतो. याचे काही मोठे शेतमळे नाहीत. तुम्हीच स्वतः अनेक दुर्गुणांनी कडू वृंदावनाचे वेलासारखे लगटलेले असून स्त्रियांवरच ढकलतां ही तुमची मोठी कुशलता आहे. एकदा दुर्गुणाचा वारा लागला म्हणजे कोणतेही साहस पुरुष किंवा स्त्री करतेच. एक चोरी केली की ती छापविण्याकरता लबाडी, लबाडीचे सत्त्व राखण्याकरिता अनेक साहसकर्मे करणे भाग होतेच. याकरिता तुम्हीच जर यांचेकडे वर डोळा करून न पाहिले तर सर्वच मिटते की नाही. आता या तोडीचे स्त्रियांचे दुर्गुण दाखवा. स्त्रिया कधी रस्त्यात तमाशे पहात, दारू पिऊन रस्त्याने लोळत, जुवेबाजात, पाचशे लुटारू बायकांची टोळी जीत एक नाही तर दोन पुरुष अशी तरी पाहिल्यात का? मदतखान्यांत, अगर भीतीविरहित एखाद्या पुरुषाचे घरी विलासांत गर्क होऊन राहिलेल्या त्या दृष्टीस पडतात काय?”*

याच आक्षेपाचा प्रतिवाद करताना यानंतर सुरू होते ती ताराबाईंची, त्यांच्या समकालीन वाङ्मयाची स्त्रीवादी समीक्षा. मराठीतली ही अशी प्रकारची चिकित्सा पहिलीच आहे. निबंधाच्या सुरुवातीला ताराबाईंनी आपल्या पुरणाग्रंथांची अशा प्रकारे केलेली चिकित्सा या आधीच पाहिली आहे. आता आपणाला ताराबाईंनी त्यांच्या समकालीन एक कथासंग्रह, एक नाटक आणि दोन कादंबऱ्यांची केलेली चिकित्सा पाहावयाची आहे.

१. स्त्री-चरित्र : रामोजी गणोजी (स्त्रियांविषयीचे बीभत्स शृंगारिक लेखन)
२. मंजुघोषा : नारो सदाशिव रिसबुद (मनोरंजक कल्पित कांदबरी)
३. मुक्तामाला : लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे (बोधपर व मनोरंजक कादंबरी)
४. मनोरमा : महादेव बाळकृष्ण चितळे (अधःपतित समाजाचे चित्रण करणारे नाटक)

वरील चार पुस्तकांचा समाचार ताराबाईंनी फार परखडपणे घेतलेला आहे. सुरुवातीलाच ताराबाईंनी टोमणा मारला आहे. तो असा :

*“या राज्यांत विद्येचे प्राबल्य व छापखाने झाल्यामुळे मंजुघोषा, मुक्तामाला, मनोरमा नाटक असे बरेच लहान लहान ग्रंथ तयार झाले आहेत. प्रत्येक गोष्टीत पुस्तकांत शृंगार, विनोद, शोक, हे तीन गुण असल्यावाचून रस भरत नाही. हे खरे, पण ग्रंथकर्त्यांनी आपण जे काही लिहितो हे घडण्यासारखे किंवा पूर्वी कधीकाळी असे घडून आले होते किंवा नाही याचा आधी विचार करून मग पुढे ग्रंथ रचावा. ”*

अशी आपल्या विचाराची तात्त्विक बैठक सांगून ताराबाईंनी एकेका पुस्तकाची चिकित्सा केली आहे. वरील लेखनाचे मूल्यमापन करताना विद्येच्या आणि छापखान्यांच्या सुकाळामुळे हे घडत आहे हे सांगायला, आपले निरीक्षण नोंदवायलाही त्या विसरत नाहीत.

‘स्त्री-चरित्र’ या रामोजी गणोजी कृत पुस्तकाची चिकित्सा करताना ताराबाईंनी त्यावर बीभत्सतेचा आरोप केला आहे. यात ज्या स्त्रिया व्यभिचार करताना दाखवल्या आहेत त्या स्त्रिया तशा स्वरूपाचा

व्यभिचार करणे स्वप्नातही शक्य नाही, असे त्यांना वाटते. या पुरुषांनी स्वतःच्या रंजनासाठी रचलेल्या केवळ कपोलकल्पित कहाण्या आहेत, असे ताराबाई आपले मत नोंदवतात.

'मंजुघोषा' या नारो सदाशिव रिसबुड यांच्या कांदबरीची चिकित्सा करताना यातील स्त्रियांचे अस्वाभाविक दर्शन आणि विज्ञानाचा अतर्क्य उपयोग यावर ताराबाईंनी सडकून टीका केली आहे. त्यात बापाला फसविणारी मंजुघोषा ही नायिका किती खोटी आणि स्त्री-स्वभावाच्या विरोधी वाटते ते सांगून ताराबाई म्हणतात की विज्ञानात इतकी प्रगती करणाऱ्या इंग्रजांनाही असे विमान तयार करता आले नाही, असे एक तर्काच्या पलीकडचे, निव्वळ कल्पनेने उभे केलेले विमान या कादंबरीतला नायक उपयोगात आणतो. बुद्धीला आणि तर्कालाही न पटणाऱ्या गोष्टींची निर्मिती करून नारो सदाशिवांनी आपल्या कथानकाचा वास्तवाशी काहीच संबंध ठेवलेला नाही.

'मुक्तामाला' या लक्ष्मण मोरेश्वर हळबे यांच्या कादंबरीची चिकित्सा करतानाही ताराबाई हाच मुद्दा पुढे मांडतात. स्त्रियांचे अस्वाभाविक चित्रण आणि अतर्क्य गोष्टींचा उपयोग हे 'मंजुघोषा'चे दोष मुक्तामालेतही दिसतात असे ताराबाई नोंदवतात.

'मनोरमा' या महादेव बाळकृष्ण चितळे यांच्या नाटकात दाखविलेले प्रसंग व विचार मनाला न पटणारे आहेत, असे ताराबाईंना वाटते. तरण्या बायका म्हाताऱ्या नवऱ्याची हेळसांड करतात, हीन वर असणाऱ्यांच्या बायका पळून जाऊन कसबिणी बनतात, कसबिणी पुरुषांना आणाभाका घालून फसवतात, ही या नाटकातली सर्व निरीक्षणे ताराबाईंना खोटी वाटतात. या सर्वच लेखनाविषयी शेवटी ताराबाई सारांशाने निरीक्षण नोंदवितात,

*"या सर्व गोष्टी बुकांतच खऱ्या. पुराणिकबुवा पुराण सांगतेवेळी पुराण सांगतेवेळी वांगी निषिद्ध कधी खाऊ नये म्हणून सर्व श्रोतेमंडळीला ओरडून ओरडून सांगतात. पण एकदा पुराणिकाची स्वारी व्यासपीठावरून उठली म्हणजे मग पुराणांतली वांगी पुराणात ठेवून घरी आली म्हणजे स्वतः पासरीभर वांगी मिटक्या मारू मारू स्वाहा करिते. तर हे ज्ञान सांगण्यालाच केले? तसा आज चालतो कोण? तिच्या वृत्ताकडे कोण पाहतो? एक तर ती ते वेळेस डोके आपटून दुष्टाच्या पायावर प्राण सोडील तरच सुटेल, नाहीतर बोलायलाच नको. तेव्हा या अशा गोष्टी लिहिणे म्हणजे काय? की एखाद्या लहान मुलाला समजाविणे आहे. नित्य क्रमावरून हे किती खोटे आहे हे सहज लक्षात येते."*

समकालीन वाङ्मयात चित्रित करण्यात आलेल्या स्त्रियांच्या दुर्गुणाचा असा प्रतिवाद करून प्रत्यक्ष पुरुषच आपल्या दुर्गुणाने स्त्रियांचा कसा छळ करतात आणि तेव्हाचे सरकारी कायदे स्त्रियांना न्याय मिळवून द्यायला कसे अपुरे आहेत, तेही ताराबाई सांगतात. जगातल्या इतर देशात या संदर्भातले कायदे कसे स्त्रियांना न्याय देणारे आहेत त्याची नोंद करून आपल्या देशातही अशा प्रकारचे कायदे सरकारने करावेत, अशी सूचनाही ताराबाई करतात,

*"असो, सर्व दुर्गुणाचे पुतळे तुम्हीच आहांत. बाबा, स्त्रियांना काय म्हणता? ...तुम्ही प्रथम तिचे मन नानाप्रकाराने मोडून एकदा मनमोहन बनलात, म्हणजे ती तर तुम्हावर अगदी भरवसा ठेवून अंतःकरणापासून प्रीती करून तिचे या जगांतले अमोल्य रत्न एक स्त्री-धर्म सोडून तुम्हीच होता व तुम्हाला ती आपला जीव अर्पण करते. तिला तुमची दगाबाजी तेव्हाच कशी समजेल? ते वेळेस तर तुम्ही तिचे पुढे*

*केवळ एखाद्या गुलामाप्रमाणे वागून तिची मर्जी राखिता, जोडे तोंडात धरून पुढे पुढे करता, अतोनात प्रीती दाखविता. पण ही तुमची प्रीती कोठपर्यंत? तुमचे मनोरथ पुरे होईपर्यंतच. एकदा तुमची ही दुष्ट वासना पुरी होऊन ती गर्भवती झाली म्हणजे मग त्या यातना, ती काळजी, तिचे कडेस सोपवून विंचवासारखे ढेकळाआड तोंडे लपवीत फिरता. तेव्हा मग ती त्या ओझ्याखाली मर्णोन्मुख झालेली दीनवदनी हरणी त्या व्याघ्ररुपी मानवाधमास आता कसे करावे हो असे जर म्हणाली तर या दुष्टाचे तोंडातून जसा काही सावच बोलतो असे शब्द बाहेर पडावयाचे, "आता आम्ही का करावे, तू केलेस ते भोग." मग हा जबाब ज्या मुखातून अतिकोमल प्रीतीचे शब्द निघत होते, ज्या मुखाला ती चंद्राप्रमाणे न्याहाळीत होती, आपला देहप्राण ज्यावरून ओवाळून टाकीत होती, ज्यावर अगदी अंतःकरणापासून प्रीती करीत होती, त्याच मुखांतून हे काळजास बाण बसणारे शब्द तिचे कानी पडत असतील तेव्हा तिची दशा कशी होत असेल? तिला ते वेळेस कसे वाटत असेल? पण बिचारी करते काय? शेवटी नाइलाज होऊन आपली अब्रु बचावण्यासाठी पोटच्या गोळ्याचासुद्धा त्याग करून केलेल्या कर्माचे प्रायश्चित भोगिते. येथे काय पडले इंग्रज सरकारचे राज्य! साक्षीवाचून पान हालणे नाही पण अशा नाजूक कामांत साक्ष मिळणे नाहीच. यात सरकारदेखील अन्यायाचे दोषाचे पात्र होते. कारण जशी लाच घेणारास एकपट व देणारास दुप्पट शिक्षा लागू केली आहे, त्याचप्रमाणे या कामांतदेखील त्यांनी सक्त कायदा करावा की, स्त्रियांना एकपट तर पुरुषाला दुप्पट सक्तीची शिक्षा होत जाईल असे का असू नये? पूर्वीचे रोमन ग्रीक लोकांत या कामास फारच मोठी जबर शिक्षा देत असत. तर इकडे सरकार लक्ष देऊन पुरुषांची तोंडे फारच लुबू लुबू करितात तर त्या तोंडावर चांगले मोठाले डाग देण्याची शिक्षा ठरवील तर पुरुष जातीस ही जबर दहशत बसून पुढे असे एकदेखील उदाहरण आढळून येणार नाही. असो, पुढे ती बिचारी गाय होऊन हाय हाय करीत, धाय धाय रडून आपल्या नेत्रोदकाने तो कलंक धूत, कारागृहात अगर आणखी कोठे तरी लज्जेचे गाठोडे डोक्यावर घेऊन जनापवाद सोशीत जन्म घालविते!! कित्येक प्राण देतात? कित्येक सर्व आप्त धनदौलत सोडून देशोधडीस जातात! तुमच्यापेक्षा सर्प बरा, तो डसल्याबरोबर प्राण तरी जातो. पण तुमचेजवळ जे विष आहे ति नित्य नित्य शरीरास असह्य दुःख देऊन प्राण घेते. असे तुम्ही सर्पापेक्षा घातकी आहात. तर आता थोर मनाचे कोण? तुमचे पायी स्त्रिया दुःख भोगितात तसे तुम्ही त्यांचेकरिता भोगल का?"*

वरील दीर्घ निवेदन ताराबाईंच्या शब्दात जाणूनबुजूनच दिलेले आहे. इंग्रज सरकारचे कौतुक करणाऱ्या ताराबाई जेव्हा केव्हा त्यांच्याही राज्यव्यवस्थेत उणिवा दिसतात तेव्हा त्यावरही टीका करायला मागेपुढे पाहात नाहीत. आपल्या कायदेकानुनात सुधारणा करायला सांगतात. पुरुषांनी बेसावध ठेवून केलेल्या अन्याय-अत्याचारामुळे स्त्रीची कशी शोकांतिका होते, याचे हृदयद्रावक चित्रणही करतात. इथे एका विलक्षण योगायोगाची आठवण होते. ताराबाईंनी पुरुषाला सापाची उपमा दिली आहे आणि साप बरा असे म्हटले आहे. अशीच कल्पना बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतही आपणाला पाहावयास मिळते.

अरे माणसा माणसा
कधी होशील माणूस
माणुसकीचा ना दाणा
कानी पडलं कनूस

मन जह्यगी जह्यरी
त्याचं न्यारं रे तंतर
आरे इचूसाप बरा

**अनुक्रमणिका**

त्याले उतारे मंतर

बहिणाबाई चौधरी आणि ताराबाई शिंदे यांच्या कल्पकतेतलं हे विलक्षण साम्य वाचून दोघींच्या अनुभूतीक्षेत्रातले साम्य आपल्या लक्षात येते. वरील उताऱ्यात दंश करून ढेकळात तोंड लपवणाऱ्या विंचवाची उपमा पुरुषाला देताना ताराबाई किती नेमकेपणाने बोलतात, तेही आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

स्त्रियांना लावण्यात आलेला आठवा दोष म्हणजे, स्त्री जाती ही स्वर्गमार्गाचा नाश करणारे यमनगरीचे द्वारच आहे. यावर प्रतिवाद करताना ताराबाई म्हणतात,

*"तुम्ही जिच्यापोटी जन्म घेतला ती आई कोण? स्त्रीच आहे ना? तिने जर तुम्हाला जन्म दिला नसता तर पुढचा प्रश्नच आला नसता. आईचं महत्त्व साऱ्या जगानं आणि देवानंही मान्य केलेलं आहे. सगळेच जण आईचं महन्मंगल स्त्रोत गातात. ती आई कोण असते? स्त्रीच ना? का स्त्री-जात त्या आईपेक्षा आणखी वेगळी आहे? जिची सेवा केली तर स्वर्गप्राप्ती होते असे तुमचे शास्त्र सांगते. तेच शास्त्र स्वर्गप्राप्ती होते असे तुमचे शास्त्र सांगते. तेच शास्त्र स्वर्गद्वारातली धोंड असेही कसे काय सांगते?"*

ताराबाई आणखीही काही प्रश्न विचारतात,

*"आता तुमच्या आईला कोणी, ती फलाणे मामासाहेबाची आई की नाही, नर्कदुर्गाची वेसच आहे, ते अमके तिमाजी बोबडे याची बहीण, केवळ कपटाची खाणच आहे; ते गोमाजीपंत कापरे, त्याची बायको तर केवळ पुण्यवृक्ष तोडण्याची कुऱ्हाडच आहे, असे जर म्हटले तर तुम्हाला बरे वाटेल काय? तुम्ही त्याचे हे असे अपशब्द सोसून उगीच बसाल?"*

स्त्री-जातीवर लावण्यात आलेला नववा व शेवटच्या आरोप म्हणजे, स्त्रिया सर्व कपट-लीलायुक्त पात्र आहेत. याचा प्रतिवाद करताना ताराबाई म्हणतात,

*"अरे, जो मित्र तुम्हांशी उघडपणे निष्कपटाने वागतो, त्याच्या तोंडावर गोड गोड बोलून, त्याच्या काळजाचा तर केवळ घडच, त्याच्या घरची प्रत्यक्ष लक्ष्मीच, त्याच्या अब्रुची रक्षण करणारी केवळ तरवारच, त्याच्या सर्व सुखादुःखाची वाटेकरीणच, त्याच्या सर्व ऐश्वर्याची स्वामीणीच, त्याच्या हृदयपुष्पवाटिकेतील मधुर केतकीच, त्याची ईश्वरी फलप्रसादाने लावलेली कोवळी डाळिंबीच, अशी त्याची प्राण सांगातीण मनोरमा, ती हरप्रकाराने" हिसकून घेऊन त्याला सदैव तुम्ही उघडे करण्यास पाहता. कोणाला जहागिरीवरून, राज्यपदावरूनदेखील खाली ओढावयास मागेपुढे पाहत नसताही स्त्रियांनाच कपटयुक्त लीलापात्रे म्हणता? शाबास रे ठकांनो."*

अशा प्रकारे स्त्री-जातीवर लावण्यात आलेल्या नऊही आरोपांचे ताराबाईंनी समर्थपणे खंडन केलेले आहे. आणि हे सर्व दोष पुरुषांतच अधिक प्रमाणात कसे दिसतात, तेही समप्रमाण सिद्ध केले आहे.

जगात जेव्हा कुठेच इतक्या सशक्तपणे स्त्रीवादाचा उदय झाला नव्हता तेव्हा ताराबाईंनी हे लेखन केलेले आहे, याला फार महत्त्व आहे. ताराबाईंचे हे विचार गाडण्याचा प्रयत्न केला पण शतकानंतर का होईना स्त्रीवादाची पहाट ताराबाई यांच्याच लेखनाने झाली, हे आपणाला मान्य करावे लागते.

ताराबाईंच्या पुस्तकाची तेव्हाच नीट चर्चा होऊन ते स्त्रियांपर्यंत पोचलं असतं आणि त्याची एक चळवळ निर्माण झाली असती तर आज महाराष्ट्राचं चित्र वेगळं दिसलं असतं. पण तसे होणे नव्हते. ताराबाईंच्या लेखनात खरोखरीच ताकद नसती तर आपणाला त्याचा इतका विचार करण्याची गरजच नव्हती. पण ताराबाईंच्या लेखनात इतकी ताकद आहे की शतकानंतरही हा मजकूर आजच्या जागतिक संदर्भ प्राप्त झालेल्या स्त्रीने मांडलेला असावा इतका वर्तमान वाटतो. म्हणूनच त्याच्या इंग्रजी अनुवादाचेही जागतिक पातळीवर स्वागत आणि कौतुक होताना दिसते. आपण महाराष्ट्रीयनांनी तर आपल्या मराठी भाषेत इतका उत्तम स्त्रीवादी ग्रंथ आहे याचा अभिमानच बाळगावा आणि ताराबाईंचे विचार आचरणात आणून समतेचा ध्वज आपल्या घराघरांतून फडकवावा.

माझ्या या लेखनाचा शेवटही मी ताराबाईंनी त्यांच्या लेखनाच्या शेवटी दिलेल्या परिच्छेदानेच करणार आहे. त्यात त्यांनी स्त्रियांनाही काही उपदेश केलेला आहे.

*“अशिक्षित, अज्ञानी, निर्बळ अशा जरी त्या आहेत तरी त्यांनी आपल्या दृढ निश्चयाने बळाने सदा सदाचरणी अग्नीसारखे शुचिर्भूत अंतरबाह्य निर्मळ राहून पुरुष-जातीस लाजवून खाली पहाण्यास लावावे, या वेगळे त्यांच्या लक्ष्मी या नावास साजण्याजोगे दुसरे भूषणच नाही. तर या सदा पतिव्रता सदाचरणी बाण्याने दोन्ही कुलांत बिजलीप्रमाणे चमकत राहण्याकरिता व त्यांचे सुकीर्तीचे ध्वज दोन्ही कुलमंदिरावर उंच उडविण्याकरिता सर्व मुलाबाळासुद्धा लक्ष्मीच्या पूर्ण वैभवांत त्यांना नांदवून सर्वांस प्रिय होवून सौभाग्याचा मळवट कपाळी भरून त्यांचा संसार शेवट गोड होवून इहलोकी व परलोकी त्यांना सुस्थळ मिळण्याकरिता अनादि सिद्धपरम कृपाळू दयानिधी करुणावर कृपासागर दिनबंधू जगनियंत्या परमेश्वराची प्रार्थना त्यांचे कल्याण होण्याकरिता मनापासून करून हा निबंध संपवितो.”*

❑

अनुक्रमणिका

# संदर्भ सूची


१. श्रीमती ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, संपादक : नागनाथ कोत्तापल्ले, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, १९९२

२. ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, संपादक : विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९९७

३. कै. ताराबाई शिंदेकृत स्त्री-पुरुष तुलना, संपादक : डॉ. स. ग. मालशे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, तिसरी आवृत्ती, १९९०

४. स्त्री-अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक, मृणालिनी जोगळेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९१

५. उगवले नारायण (लोकगीते-स्त्रीगीते), संपादक : इंद्रजित भालेराव, प्रतिभास प्रकाशन, परभणी, पहिली आवृत्ती, १९९६

६. संत जनाबाई (निवडक अभंगांचे संपादन), संपादक : इंद्रजित भालेराव, प्रतिभास प्रकाशन, परभणी, पहिली आवृत्ती, १९९६

७. लीळाचरित्र (म्हाइमभट्टकृत महानुभावीय ग्रंथ), संपादक : डॉ. वि. भि. कोलते, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पहिली आवृत्ती, १९७८.

८. महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपादक : य. दि. फडके, हरी नरके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ


❏

अनुक्रमणिका

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**
**महाराष्ट्राचे शिल्पकार योजनअंतर्गत मालिकेतील चरित्रग्रंथ**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) | साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) | दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) | क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) | डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) | शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) | मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) | तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) | यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |
| १५) | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | श्री. व्ही. डी. मेश्राम | रु. ३५/- |
| १६) | स्वामी रामानंद तीर्थ | श्री. प्रकाश मेदककर | रु. ४५/- |
| १७) | पठ्ठे बापूराव | श्री. चंद्रकुमार नलगे | रु. ४५/- |
| १८) | भाई उद्धवराव पाटील | श्री. व. न. इंगळे | रु. ५५/- |
| १९) | धोंडो केशव कर्वे | डॉ. न. म. जोशी | रु. ४०/- |
| २०) | लोकहितवादी | डॉ. निर्मलकुमार फडकुले | रु. ४०/- |
| २१) | यदुनाथ थत्ते | डॉ. मु. ब. शहा | रु. ४०/- |
| २२) | गोविंदभाई श्रॉफ | डॉ. विजय दिवाण | रु. ४५/- |
| २३) | लोककवी शाहीर रामजोशी | श्री. शिरीष गंधे | रु. ४५/- |
| २४) | वसंतराव नाईक | डॉ. उत्तम रुद्रवार | रु. ३५/- |
| २५) | महात्मा फुले | श्री. श्रीराम गुंदेकर | रु. ४०/- |
| २६) | स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव | श्री. व्यंकटेश कामतकर | रु. ४६/- |
| २७) | ना. ग. गोरे | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ३५/- |
| २८) | शंकरराव चव्हाण | डॉ. सुरेश सावंत | रु. ४५/- |
| २९) | पंडिता रमाबाई | डॉ. सिसिलिया कार्व्हालो | रु. ४५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०) | बॅ. नाथ पै | श्री. जयानंद मठकर | रु. ४०/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार

मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व

महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

***अधिक माहिती/चौकशीसाठी***

सचिव,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

पु. ल. देशपांडे कला अकादमी,

दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत,

सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०१४

दूरध्वनी - २४२२६१५६/२४३२५९२९

अनुक्रमणिका



हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातल्या रिधोरा या गावी १९६२ साली जन्मलेल्या इंद्रजित भालेराव यांचे शालेय शिक्षण रिधोरा, आहेरवाडी, हयातनगरसारख्या खेड्यातून चिखल-काट्याचा रस्ता तुडवत झालेले आहे. महाविद्यालयीन शिक्षण वसमतच्या बहिर्जी स्मारकमधून तर विद्यापीठीय शिक्षण औरंगाबादमधून झालेले आहे. एम. ए. च्या परीक्षेत त्यांनी विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळवले आहे.

इंद्रजित भालेराव हे सध्या परभणीचे रहिवाशी असून वरिष्ठ महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करतात. 'पीकपाणी' या १९८९ साली प्रकाशित झालेल्या पहिल्याच कवितासंग्रहाने त्यांना मोठी मान्यता मिळवून दिली. 'दूर राहिला गाव', 'आम्ही काबाडाचे धनी', 'कुळंबीणीची कहाणी', 'पेरा' या नंतरच्या कवितासंग्रहांनाही राजमान्यता, रसिकमान्यता आणि समीक्षकांचीही मान्यता मिळत गेली. शालेय अभ्यासक्रमापासून विद्यापीठापर्यंत त्यांच्या कविता आणि संग्रह अभ्यासासाठी नेमण्यात आलेले आहेत. राज्य पुरस्कारापासून शेतकरी पुरस्कारापर्यंत अनेक पुरस्कार त्यांच्या लेखनाने पटकाविले आहेत.

कवितावाचनाच्या आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीमुळे त्यांनी प्रचंड लोकप्रियता मिळविली आहे. महाराष्ट्राबाहेरही त्यांचे काव्यवाचनाचे कार्यक्रम लोकप्रिय ठरले आहेत.

'गाई घरा आल्या', 'लळा', 'भिंगुरवाणा' ही ललित गद्याची पुस्तके प्रसिद्ध असून संत जनाबाई व बहिणाबाई चौधरी यांच्यावरचे आस्वादपर लेखन आणि आता ताराबाई शिंदे यांच्यावरचे लेखन प्रसिद्ध होत आहे. बी. रघुनाथ यांच्या समग्र वाङ्मयाचे संपादन त्यांनी केले असून संपादन आणि ललित गद्यलेखनाचेही राज्य पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

अनुक्रमणिका